**नेमणे आहे**

नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड
संपर्क:- ८८९६७११७११

jantaawajnews@gmail.com

दैनिक

# जनता आवाज

**साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्**

पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.



सिमेंट पाईप | सेफ्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल

सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534 | अमोल सितराम थोरात पा. 9764626533 | ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु||

राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु|| 9765481334

अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक १०६ | शुक्रवार, दि. ०६ जून २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये

## संमिश्र

### पोलिस बापाकडून मुलीवर अत्याचार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अमरावती :** पोलिस वडिलांकडून आपल्या पोटच्या मुलीवर वर्षभर शारीरिक अत्याचार करण्यात आल्याची किळसवाणी घटना अमरावतीत घडली आहे. या घटनेमुळे बापलेकीच्या पवित्र नात्याला काळीमा फासला गेला आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, अमरावती शहरातील राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीत हा संतापजनक प्रकार घडला आहे. पीडित तरुणी २४ वर्षांची आहे. तिच्या तक्रारीनुसार पोलिसांनी आरोपीवर गुन्हा दाखल केला आहे.

### अमेरिकेत नागरिकांना प्रवेश बंदी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वॉशिंग्टन :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी १२ देशांमधील लोकांना अमेरिकेत प्रवेश करण्यास पूर्णपणे बंदी घालण्याचा आदेश जारी केला आहे. अमेरिकेच्या सुरक्षेसाठी आणि लोकांच्या जीविताचे रक्षण करण्यासाठी हे पाऊल आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या देशांमध्ये अफगाणिस्तान, म्यानमार, चाड, काँगो प्रजासत्ताक, विषुववृत्तीय गिनी, इरिट्रिया, हैती, इराण, लिबिया, सोमालिया, सुदान आणि येमेन यांचा समावेश आहे. ही बंदी ९ जूनपासून लागू होत आहे.

### अभियंता तरुणीची पुण्यात आत्महत्या

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणे :** पुण्यातील हिंजवडी येथून एक धक्कादायक घटना समोर आली असून, एका २५ वर्षीय आयटी क्षेत्रात कार्यरत असलेल्या तरुणीने २१ व्या मजल्यावरून उडी घेत आत्महत्या केली आहे. माझी जगायची इच्छा संपली आहे, अशी चिठ्ठी लिहून या तरुणीने आपले आयुष्य संपवले. याप्रकरणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

### चर्चगेट रेल्वे स्थानकात आग

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** मुंबईच्या चर्चगेट स्थानाकाला भीषण आग लागल्याची घटना समोर आली आहे. येथील केकच्या दुकानाला आग लागल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे स्थानकावर सर्वत्र मोठ्या प्रमाणात धूर पसरला आहे. आग आटोक्यात आली आहे.




# नागपूर-मुंबई होणार वेगवान प्रवास

जनता आवाज वृत्तसेवा

**नाशिक : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नाशिकमधील इगतपुरी ते ठाण्यातील आमणे पर्यंतच्या ७६ किमी लांबीच्या समृद्धी महामार्गाच्या अंतिम टप्प्याचे उद्घाटन आज झाले आहे. यामुळे एका अर्थाने मागील वेळी मुख्यमंत्री असताना फडणवीस यांनी पाहिलेले स्वप्न आता पूर्ण झाले आहे. यामुळे नागपूर ते मुंबई मधील अंतर कमी झाले असून वेळेची मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे.**

राज्याच्या पायाभूत सुविधांच्या विकास गाथेतील एक मुकुटमणी, हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाचा अंतिम टप्पा (इगतपुरी ते आमणे -७६ किमी) सज्ज झाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते समृद्धी महामार्गावरील इगतपुरीआमणे (७६ किमी) अंतिम टप्प्याचे भव्य लोकार्पण होत आहे. या लोकर्पणानंतर संपूर्ण ७०१ किमी लांबीचा समृद्धी महामार्ग वाहतुकीसाठी खुला होऊन नागपूर-मुंबई प्रवास फक्त ८ तासांत पूर्ण करता येणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एकाच गाडीत प्रवास केला असला तरी उपमुख्यमंत्री अजित पवार मात्र वेगळ्या गाडीतून या मार्गावरून जाताना दिसले. त्यामुळे याबाबत वेगवेगळ्या चर्चा सुरू झाल्या होत्या. सरकार म्हणून आम्ही एकत्र काम करत आहोत. एकत्र निर्णय घेतले जात आहेत. हेलिकॉप्टरमध्ये देखील या तिघांनी एकत्र प्रवास केला. राज्यातील प्रत्येक कार्यकर्त्याला आपल्या नेत्याने आपल्या गाडीत बसावे, अशी इच्छा असते. समृद्धी महामार्गावर अकरा लाख मोठी आणि बावीस लाख छोटी झाडे लावण्यात येणार आहे.असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

## फडणवीसांच्या हस्ते 'समृद्धी' मार्गाचे लोकार्पण



चासनळी, मंजूर, कुंभारी, कोपरगाव शहरील विविध देवस्थाने, संवत्सर, कोकमठाण यासह ३० ते ३५ गावांना गोदावरी तीर लाभला आहे. त्यामुळे ऐतिहासिक महत्व असणाऱ्या कोपरगाव मतदारसंघातील इतरही देवस्थानांना लवकरच या प्रकारचा निर्णय सरकार घेईल, अशीही मागणी केलेली आहे. तिलाही लवकरच यश मिळेल.

### समृद्धी महामार्गावर ६५ उड्डाणपूल, ६ बोगदे

समृद्धी महामार्ग १५० किमी प्रतितास गतीने प्रवासासाठी डिझाइन करण्यात आला आहे. या महामार्गावर ६५ उड्डाणपूल, २४ इंटरचेंज, कसारा घाटात ६ बोगदे आणि अनेक वाहन तसेच पादचारी अंडरपास आहेत. इगतपुरी ते मुंबई दरम्यान कसारा घाटा जवळ ८ किलोमीटर लांब जुळ्या बोगद्यांपैकी एक बनवण्यात आला आहे, जो अत्याधुनिक जर्मन तंत्रज्ञानावर आधारित फुल वॉटर मिस्ट सिस्टिमने सुसज्ज आहे.

### देशातील सर्वात अत्याधुनिक महामार्ग

समृद्धी महामार्गाचा इगतपुरी ते आमणे हा शेवटचा ७६ किमी लांबीचा मार्ग आहे. या मार्गावर वाहने धावू लागल्यावर इगतपुरी ते कसारा घाट अवघ्या ८ मिनिटात पार करता येणार आहे. याआधी मुंबईहून नाशिकला जाताना पुर्वी ४ तासापेक्षा अधिक वेळ लागत होता. समृद्धी ६ पदरी, १२० मीटर रुंदीचा आणि ७०१ किलोमीटर लांबीचा असुन देशातील सर्वात अत्याधुनिक महामार्ग आहे.

# मांडओहळच्या दुरुस्तीला २० कोटी?

## ...अखेर आ. काशिनाथ दाते यांच्या पाठपुराव्याला यश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** पारनेर तालुक्यासाठी वरदान ठरलेल्या मांडओहोळ डावा कालवा दुरुस्ती, अस्तरीकरण व वितरिका दुरुस्ती कामास मंजुरी मिळाली असून २० कोटींच्या कामांना प्रशासकीय मान्यता मिळणार आहे, त्यामुळे मांडओहळ धरण लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांना पूर्ण क्षमतेने पाणी मिळणार असल्याची माहिती आ. काशिनाथ दाते यांनी दिली.

आ. दाते यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना पंधरा दिवसांपूर्वी गोदावरी खोऱ्यातील नव्याने प्रस्तावित केलेले वासुंदे तांबडीकार, मोरवाडी, निमदरी व वारणवाडी या ठिकाणचे बंधारे तसेच मांडओहळ धरणाचे डाव्या कालव्याची गळती थांबवावी, कालव्याची दुरुस्ती व अस्तरीकरण कामासाठी बैठक घेण्याची विनंती मंत्री विखे यांना केली होती.

गळतीमुळे हा कालवा पूर्ण क्षमतेने प्रवाहित होत नव्हता. त्यामुळे आ. दाते यांनी शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाण्यासाठी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे विशेष दुरुस्तीसाठी निधी देण्याची मागणी लावून धरली होती. ती विनंती तात्काळ मान्य करून आ. दाते पान ४



मांडओहळ धरणाचे व कालव्याचे काम होऊन जवळपास ५० वर्ष पूर्ण झाले. ३० वर्षांपूर्वी काही भागांमध्ये अस्तरीकरण काम झाले होते. परंतु, आता ते देखील खराब झाले आहे. कालवा एकूण २६ कि.मी. लांबीचा असून खडकाळ भागातून गेल्यामुळे खडकाचे सपामधून मोठ्या प्रमाणावर गळती होते. अस्तरीकरण संपूर्ण झाल्यास वाया जाणारे पाण्याची बचत होवून त्यावर असलेले पिण्याचे पाणी योजना व वासुंदे, खडकवाडी, पळशी येथील शेतीला सुद्धा आवर्तन परिपूर्ण मिळेल, मांड ओहळ नदीवरील बंधारे सुद्धा भरून घेणे शक्य होणार आहे.

**- काशिनाथ दाते, आमदार**

# पर्यावरण संवर्धन हे प्रत्येकाचे मूलभूत कर्तव्य

## माजी मंत्री थोरात; थोरात कारखाना परिसरात २०१ आंबा वृक्षांचे रोपण




**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** हवामान आणि ऋतूंमधील बदल याचबरोबर वाढती उष्णता आणि ग्लोबल वार्मिंगची समस्या टाळण्याकरता वृक्षारोपण व संवर्धन अत्यंत महत्त्वाचे आहे. सजीव सृष्टीच्या रक्षणासाठी पर्यावरण संवर्धन हे अत्यंत महत्त्वाचे असून ते प्रत्येकाने मूलभूत कर्तव्य म्हणून बजावले पाहिजे, असे प्रतिपादन माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

जागतिक पर्यावरण दिना निमित्त दंडकारण्य अभियानांतर्गत सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना परिसरामध्ये २०१ आंबा वृक्षांचे तसेच तालुक्यात विविध ठिकाणी वृक्षांचे रोपण करण्यात आले.

यावेळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात, कारखान्याचे व्हा. चेअरमन पांडुरंग घुले, रणजितसिंह देशमुख, संपतराव डोंगरे, सुधाकर जोशी, जगन्नाथ घुगरकर, प्रा. बाबा खरात, संपतराव गोडगे, तुषार दिघे, विनोद हासे, रामदास पान ४

ग्लोबल वार्मिंगच्या समस्येवर मात करण्याकरता सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांनी २००६ मध्ये दंडकारण्य अभियान सुरू केले. या अंतर्गत तालुक्यातील उघड्या बोडक्या डोंगरांवर वृक्षारोपण करण्यात आले. तालुक्यामध्ये वृक्ष संवर्धन संस्कृती वाढली आहे. पर्यावरण जपणे हे प्रत्येकाचे कर्तव्य बनले आहेत.


**- बाळासाहेब थोरात, माजी मंत्री**

### रिमझिम पावसात पर्यावरण गीते

काल ५ जून जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कारखाना परिसरामध्ये वृक्षारोपण करताना रिमझिम पाऊस सुरू झाला. यावेळी प्रा. बाबा खरात यांनी विविध पर्यावरण संवर्धनाची गीते गायली. झाडे लावा, झाडे जगवा, पाणी आडवा, देश वाचवा या घोषणांनी परिसर दुमदुमला होता.

# कोल्हारमध्ये दोन वाहनांचा भीषण अपघात

## दोन वाहनांची समोरासमोर धडक; १४ जण जखमी; दोनही वाहन चक्काचूर



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार :** भारतीय सैन्यात भरती होणाऱ्या नातवाला न सांगता अचानक भेटून आश्चर्यचकित करण्याच्या उद्देशाने कर्नाटकहून नाशिककडे निघालेल्या कुटुंबियांना तसेच दुसऱ्या वाहनात मध्य प्रदेशहून अहिल्यानगरला लग्नाला निघालेल्या पाहुण्यांना कोल्हार येथील पुलावर गुरुवारी (दि. ५) पहाटे अपघाताला सामोरे जावे लागले. दोन भरधाव वाहनांची समोरासमोर धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात १४ जण जखमी झाल्याची घटना घडली.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे आहे की, नाशिक येथे वास्तव्यास असलेला नातू सैन्य भरतीसाठी आवश्यक असलेल्या सर्व परीक्षा उत्तीर्ण झाला. गुरुवारी त्याची अंतिम परीक्षा होती. नातवाला न सांगता अचानकपणे त्याला भेटून आश्चर्यचकित करण्यासाठी लखामपूरहून (कर्नाटक) निघालेल्या आजोबांसह सर्व कुटुंबियांचा कोल्हारच्या पुलावर अपघात झाला. त्यांच्या वाहनाची (क्रमांक केए.४९, एम.२५५६) समोरून येणाऱ्या कारला (क्रमांक एमपी.०७, झेडएक्स.४२३०) समोरासमोर जबर धडक झाली. पान ४

### भीषण अपघातात हे १४ जण जखमी

अपघातात प्रकाश बलअप्पा दलवाई, नागमीना मारुती हुलीकुई, शिदलीनअप्पा दलवाई, पूर्वा शिवानंद फुलवाई, अशोक देसाई फुलवाई, आकाश फकीरअप्पा कचेशयामी, सुनंदा मदरअप्पा अवली, प्रभूचरणअप्पा धमर, मालवा दलवाई, हनेमखा रामअप्पा कुलगोई, शिवानंद कुलगिरे (सर्व रा. लखामपूर, जि. बागलकोट, कर्नाटक) आणि संजय घनश्यामसिंग राठोड, मीरा संजय राठोड, स्नेहा बिरू राठोड (सर्व रा. गुना, मध्य प्रदेश) हे जखमी झाले आहेत.

# 'एक व्यक्ती दोन झाडे' उपक्रम कौतुकास्पद

## आयुक्त यशवंत डांगे; जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** वृक्षारोपण व त्याचे संवर्धन ही काळाची गरज बनली असून, नागरिकांशिवाय ते काम यशस्वी होऊ शकत नाही. द्वारका कॉलनी, जाधव नगरमधील नागरिकारनी 'एक व्यक्ती दोन झाडे' दत्तक घेऊन त्याचे पालकतत्व स्वीकारले आहे. त्यामुळे वृक्षारोपणाची मोहीम यशस्वी होईल व नागरिकांनी हाती घेतलेला उपक्रम समाजाला दिशादर्शक ठरेल. मनपा माजी विरोधी पक्ष नेते संपत बारस्कर यांनी वृक्षारोपणाचा हाती घेतलेला उपक्रम कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.

प्र. क्र. १ मधील द्वारका कॉलनी, जाधवनगर येथे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण संपन्न झाले.

यावेळी आयुक्त यशवंत डांगे, मनपा माजी विरोधी पान ४



गेल्या ७०० वर्षांपूर्वी संत तुकाराम महाराज व ज्ञानेश्वर महाराज यांनी वृक्षाचे महत्त्व पटवून दिले होते. मात्र आपण आजही त्या विषयावर काम करत आहोत. वृक्षारोपण व संवर्धनाचे काम नागरिकांशिवाय यशस्वी होऊ शकत नाही. वृक्षारोपणाचे काम फोटोसेशन पुरते मर्यादित न ठेवता त्याचे जतन करण्याचे काम केले पाहिजे. नागरिकांनी वृक्षाचे पालकत्व स्वीकारून संवर्धनाचे काम सुरू केलेला उपक्रम कौतुकास्पद आहे.

**- संपत बारस्कर, माजी नगरसेवक**

# भाविकांसह पर्यटकांना सोईसुविधा निर्माण होणार

## पुणतांबा गोदावरी घाट विकासासाठी विवेक कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केलेल्या मागणीला यश

जनता आवाज वृत्तसेवा

**कोपरगाव : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त अहिल्यादेवींनी उभारलेल्या ऐतिहासिक जलसंपत्तींच्या जतनासाठी एक महत्त्वपूर्ण आणि लोककल्याणकारी निर्णय नुकताच घेण्यात आला आहे. दि. ६ मे २०२५ रोजी चौंडी येथे मंत्री परिषदेच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.**



या बैठकीत अहिल्यादेवी होळकरांच्या कार्याचा गौरव राखण्यासाठी व ऐतिहासिक जलसंपत्तीचे जतन करण्याच्या दृष्टिकोनातून व्यापक योजना आखण्यात आली. यात पुणतांबा येथील गोदावरी घाटाचा समावेश झाल्याने यापूर्वीच सहकार महर्षी कोल्हे कारखाना अध्यक्ष युवानेते विवेक कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे विविध देवस्थान आणि तीर्थक्षेत्र विकास नाशिक येथे होणारा सिंहस्थ कुंभमेळा पार्श्वभूमीवर व्हावा, अशी मागणी केलेली होती. त्यातील पुणतांबा येथील मागणी पूर्ण होत असल्याने मुख्यमंत्री व शासनाने त्यांनी आभार व्यक्त केले आहे.

विशेष बाब म्हणजे या योजनेत कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील पुणतांबा येथील गोदावरी नदीवरील ऐतिहासिक घाटाचा समावेश करण्यात आलेला आहे. या निर्णयामुळे पुणतांबा येथील घाटाचे जतन, दुरुस्ती आणि सुशोभीकरण करून भाविक व पर्यटकांसाठी अधिक सुविधा निर्माण होतील. याबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना युवानेते विवेक कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आणि शासनाचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

सिंहस्थ कुंभमेळा नाशिक येथे होणार असल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे विविध तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी विशेष प्रयत्नांची मागणी केली होती.

त्यातूनच कोपरगाव मतदारसंघातील पुणतांबा गोदावरी घाटाचा समावेश झाल्याने हा निर्णय अत्यंत स्वागतार्ह व जनतेच्या भावना जपणारा ठरला आहे, असे मत विवेक कोल्हे यांनी व्यक्त केले. ही योजना पुण्यश्लोक अहिल्यादेवींना अभिवादन करत त्यांच्या ऐतिहासिक वारशाचे जतन करणारी असून ती भावी पिढ्यांसाठी अमूल्य ठरेल व होऊ घातलेल्या कुंभमेळ्यासाठी हा निर्णय अतिशय मोलाचा आहे, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

### प्राथमिक संकलनात ३४ जलस्रोतांचा समावेश

या निर्णयाअंतर्गत राज्यभरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी उभारलेले तलाव, विहिरी-बारव, कुंड, घाट यांची दुरुस्ती, गाळ काढणे, पुनरुज्जीवन व सुशोभीकरण करण्याच्या कामांना मान्यता देण्यात आली आहे. या कामांची अंमलबजावणी मृद व जलसंधारण विभागामार्फत केली जाणार असून सध्या प्राथमिक संकलनात ३ तलाव, १९ विहिरी-बारव, ६ कुंड व ६ घाट अशा एकूण ३४ जलस्रोतांचा समावेश करण्यात आला आहे.

चासनळी, मंजूर, कुंभारी, कोपरगाव शहरील विविध देवस्थाने, संवत्सर, कोकमठाण यासह ३० ते ३५ गावांना गोदावरी तीर लाभला आहे. त्यामुळे ऐतिहासिक महत्व असणाऱ्या कोपरगाव मतदारसंघातील इतरही देवस्थानांना लवकरच या प्रकारचा निर्णय सरकार घेईल, अशीही मागणी केलेली आहे. तिलाही लवकरच यश मिळेल.

**- विवेक कोल्हे**

# देशाच्या अन्नदात्यावर उपोषणाची वेळ?

## शेतकऱ्यांच्या उपेक्षेला कंटाळून आंदोलनाचा इशारा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**गंगापूर :** गंगापूर तालुक्यातील शाहापूर येथील शेतकरी प्रशासनाच्या उदासीन धोरणांमुळे आक्रोशित झाले असून, त्यांनी आपल्या मागण्यांसाठी पुन्हा एकदा आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे.

काही दिवसांपूर्वी शाहापूर येथील शेतकऱ्यांनी गंगापूर पंचायत समितीवर गंभीर आरोप करत आत्मदहनाचा प्रयत्न केला होता. त्यांच्या विहिरी, गायगोठे, फळबाग लागवड यांसारख्या वैयक्तिक योजनांच्या फाईली अनेक महिने धुळखात पडून आहेत. या फाईलींवर कोणतीही कारवाई होत नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

शेतकऱ्यांच्या आत्मदहनाच्या प्रयत्नानंतर पोलीस हस्तक्षेपामुळे २० मे रोजी आंदोलन स्थगित करण्यात आले होते. यावेळी प्रशासनाने ठोस आश्वासन देत शेतकऱ्यांना थांबवले होते. मात्र, आज अखेरही त्यांचे प्रश्न तसेच राहिल्याने शेतकऱ्यांचा संयम सुटला आहे.

प्रशासनाच्या आश्वासनांना वैतागून शाहापूर येथील शेतकरी संतोष रुस्तूम शिंदे, उद्धव शांताराम शिंदे, कैलास रुस्तूम भराड, आबासाहेब तुकाराम शिंदे, बंडू अर्जुन शिंदे, दत्तात्रय आळंजकर, मच्छिंद्र भराड आणि दिगंबर गवारे यांनी ५ जूनपासून जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर येथे तीव्र आंदोलन सुरू केले आहे.

जर प्रशासनाने लवकरात लवकर ठोस पावले उचलली नाहीत, तर आंदोलन तीव्र करण्याचा आणि व्यापक स्तरावर घेऊन जाण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

### शेतकऱ्यांचे विविध प्रश्न आणि संताप

गंगापूर पंचायत समितीवर सातत्याने गंभीर आरोप झाले तरी प्रशासनाचे दुर्लक्ष कायम. शेतकऱ्यांना त्यांच्या वैयक्तिक योजना मंजूर करून घेण्यासाठी पैसे मोजावे लागत असल्याचा आरोप. भ्रष्टाचार, विलंबित प्रक्रिया आणि दुर्लक्षामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान. शासनाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठीच जर शेतकऱ्यांना संघर्ष करावा लागणार असेल, तर हे अन्नदात्यांसमोरील मोठे संकट आहे.

# ज्येष्ठांच्या अनुभवाची शिदोरी आजच्या पिढीला दिशादर्शक

## माजी सभापती कुमारसिंह वाकळे; बोल्हेगाव येथे ज्येष्ठ नागरिकांचा अभिष्टचिंतन सोहळा उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** पूर्वीच्या काळी आई-वडील आपल्या मुला-मुलीला शाळेत घालण्याच्या वेळी जन्मतारीख माहित नसायची त्यावेळी सरसकट १ जून ही तारीख टाकली जायची त्यामुळे अनेकांचे वाढदिवस १ जूनला येत असतात. त्यालाच सरकारी वाढदिवस म्हटले जाते. या ज्येष्ठांनी कधीही आपला वाढदिवस साजरा केला नाही, त्यांना आपली जन्मतारीखच माहिती नसायची यासाठी त्यांच्या जुन्या आठवणीला उजाळा देण्यासाठी सर्वांना एकत्रित केले.

आत्ताची मोबाईल पिढी घातक आहे. त्यांचे विचार क्षणामध्ये बदलत असतात आपल्या गावामध्ये जातीपातीचे राजकारण आणायचे नाही. १०-२० मते मिळाली नाही, तरी चालेल मात्र गावाने एकोप्याने राहायचे आहे, हीच आपली खरी संस्कृती आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या अभिष्टचिंतन सोहळा वेळी त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद हास्य पाहून मनाला



समाधान मिळाले, असल्याचे प्रतिपादन मनपा स्थायी समितीचे माजी सभापती कुमारसिंह वाकळे यांनी केले.

बोल्हेगाव येथे माजी सभापती कुमारसिंह वाकळे यांच्या वतीने गावातील ज्येष्ठ नागरिकांचा अभिष्टचिंतन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी किसन कोलते, बच्चु काते, मारूती कापडे, बाळासाहेब वाकळे, मच्छिंद्र वाकळे, भाऊसाहेब वाकळे, गुलाब सय्यद, नाथा वाटमोडे, भाऊसाहेब वाकळे, रावसाहेब वाकळे, दादा डुरकुले, छबुराव वाकळे, पंढरीनाथ कापडे, आसाराम कराळे, गोरख कोलते, बाबजी वाकळे, संजय जाधव, विलास ससे, राम कदम, लक्ष्मन आमले, भीमा कदम, बाळासाहेब सोनवणे, रमेश पवार आदीसह ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> ज्येष्ठांच्या अनुभवाची शिदोरी आजच्या पिढीला दिशादर्शक व प्रेरणादायी ठरत आहे. त्यांच्या विचारामुळेच आपल्या कुटुंबातील तरुण पिढी सुसंस्कृत बनली आहे. त्यांचा वारसा आपल्या सर्वांना पुढे घेऊन जायचं आहे, आणि समाजामध्ये चांगली पिढी निर्माण करायची आहे. नगरसेवक पद येत असते आणि जात असते, मात्र ज्येष्ठ नागरिक हे कायम आपल्याबरोबर राहत असतात.
>
> **– कुमारसिंह वाकळे, माजी सभापती मनपा**

# पर्यावरणदिनी सर्पाची निसर्गात मुक्तता



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** शहरानजीक असलेल्या मेहेकरी सारोळा बारादरी शहापूर बारा बाभळी केतकी अशा विविध ठिकाणाहून नागरी वस्तीत आढळून आलेले नाग, घोणस, धामिन, कोब्रा, अजगर सरपाची सर्पमित्र कृष्णा बेरड पाटील यांनी धरलेले साप पर्यावरण दिनाचे औचित्य साधून आठ सर्प निसर्गात मुक्तता केली.

सर्पमित्र कृष्णा पाटील बेरड यांनी वन अधिकारी खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व साप निसर्गात मुक्त केले. यावेळी सर्पमित्र कृष्णा बेरड, ओम जंगम, मकरंद देशमुख, नवनाथ कापसे, आनंद दळवी, राहुल साळुंखे, ऋषिकेश खामकर आदी उपस्थित होते.

सर्पमित्र बेरड म्हणाले की, नागरिकांनी काळजी घ्या साप जगवा निसर्ग वाचवा हे ब्रीद वाक्य म्हणत पावसाळ्याचे दिवस असल्याने नाग, घोणस, धामिन, कोब्रा, अजगर आधी विविध प्रजातीचे सर्प भरपूर प्रमाणात आढळून येतील. नागरिकांनी सर्पांना न मारता सर्प आढळल्यास ९३७००७५५५५, ९६६५०७५५५५ या नंबरवर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# कचेश्वर रोकडे यांचे निधन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव शहर :** कोपरगाव तालुक्यातील माहेगाव देशमुख



येथील राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त माजी पोलीस अधीक्षक तसेच बहुजन विकास एकता समितीचे संस्थापक अध्यक्ष कचेश्वर पांडुरंग रोकडे यांचे निधन झाले. ते ७९ वर्षाचे होते. यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

# दुचाकीची चोरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** हॉटेलसमोर रस्त्याच्या कडेला लावलेली हिरो कंपनीची स्प्लेंडर प्रो. मोटारसायकल (क्र. एम एच १६ बी एल ९८८३) कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली.

# मनोज जरांगेंकडून पवार कुटुंबियांची सांत्वनपर भेट



**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** येथील मराठा सेवक अवधूत पवार यांचे वडील प्रसिद्ध लेखक, कवी प्रा. आ. य. पवार यांचे नुकतेच निधन झाले. या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटील यांनी पवार यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची सांत्वनपर भेट घेतली. यावेळी मनोज जरांगे यांनी पवार कुटुंबीयाचे विचारपूस करून सांत्वन केले.

यावेळी बावी सोसायटीचे चेअरमन सुंदरदास बिरंगळ, तात्यासाहेब बांदल, संभाजी मुळे, संभाजी ढोले, दादासाहेब ढवळे, बाळासाहेब राऊत, किरण पवार, भाऊराजे शिंदे, महादेव डोके, हिरालाल घुमरे, कृष्णकुमार मुरुमकर आदि उपस्थित होते.

मनोज जरांगे पाटील हे मराठा आरक्षणाचं नेतृत्व करतात. मनोज जरांगे हे बीडचे रहिवासी आहेत. पण लग्नानंतर जालन्यातील शहागड ही त्यांनी आपली कर्मभूमी केली.

मनोज जरांगे यांनी जालन्यातील अंतरवली सराटीतून मराठा आरक्षणासाठी उपोषणं सुरू केली होती. त्यांनी अनेकवेळा उपोषण केलं. त्याचा परिणाम म्हणून मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याचा आणि त्याचं वाटप सुरू करण्याचं काम सरकारने केलं.

तसेच सगेसोयऱ्यांनाही आरक्षणाचा लाभ मिळावा म्हणून मनोज जरांगे पाठपुरावा करत आहेत. काही प्रमाणात त्याला यशही आलं आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाचं फलित म्हणून सरकारने मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी विविध उपाययोजना केल्या आहेत.

# ऐतिहासिक वारसा उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर?



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** नुकतेच अहमदनगर शहराचा ५३५ वा वर्धापण दिवस साजरा करण्यात आला, परंतु अहमदनगरचे कलेक्टर तथा आयुक्त शहराच्या संस्थापकाच्या मजार वर आले नाहीत, तसेच पुरातत्व विभागचा ही कोणताही सक्षम अधिकारी तेथे उपस्थित नव्हतं. तिथे जायला रस्ता पण नाही याचा फार खेद वाटत आहेत.

शहरातील इतर ऐतिहासिक वस्तूचे जतन व्हयला पाहिजे. नेअमतखानी गेटच्या चोहू बाजू दारुड्या लोकांनी गांजा फुकणाऱ्यानी व्यापलं आहेत. तेथे अक्षरशं लगवी करतात. परंतु पुरातत्व विभागातर्फे काहीच उपाय योजना करण्यात येत नाही.

नेअमतखानी गेटची रिपेरिंग करने अत्यंत गरजेचं असून त्वरित रिपेरिंग करून बागरोजा आणि फराहबाग येथील इमारत ताबडतोब दुरुस्त करून जाण्यासाठी रस्ता करा. जर लवकर सदर कामं झाले नाहीत, तर या विरोधात समाजवादी पार्टी अहमदनगर दि. १२ जून २०२५ ला अहमदनगर पुरातत्व कार्यालयात ठिय्या आंदोलन करेल, असे शहर जिल्हाध्यक्ष आबीद हुसैन यांनी जिल्हाधिकारी अहमदनगर यांना निवेदनाद्वारे कळविले आहे.

# साकेगावमध्ये रंगला माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** हुतात्मा बाबू गेणु शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल, साकेगाव येथे तब्बल पंचवीस वर्षांनंतर सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षात दहावीच्या वर्गात शिकणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा आणि विद्यार्थिनींचा एक स्नेहपूर्ण आणि अविस्मरणीय गेट-टुगेदर स्नेह मेळावा उत्साहात संपन्न झाला.

शाळेच्या प्रांगणात पुन्हा एकदा जुन्या आठवणींना उजाळा देत, माजी विद्यार्थ्यांनी आपल्या बालपणीच्या गोड क्षणांना आणि शिक्षकांशी असलेल्या नात्यांना स्मरण केले. हा मेळावा सर्वांसाठी भावनिक आणि आनंददायी ठरला.

पंचवीस वर्षांपूर्वी लाकडी बाकांवर बसून एकत्र शिकणारे, खेळणारे आणि हसणारे हे माजी विद्यार्थी आणि विद्यार्थिनी या गेट-टुगेदरच्या निमित्ताने पुन्हा



एकदा शाळेच्या प्रांगणात एकत्र आले. सन १९९९-२००० मध्ये दहावीच्या वर्गात शिकणाऱ्या या मित्र-मैत्रिणींनी आपल्या शालेय जीवनातील कडू-गोड आठवणींना उजाळा दिला.

या मेळाव्याला शाळेचे माजी मुख्याध्यापक अण्णासाहेब लाटे यांच्यासह भानुदास शिंदे, भागचंद गमे, सुभाष गव्हाणे, सदाशिव तांदळे, भरत मुळे, रावसाहेब खोजे, नवनाथ सकुंडे, गीताराम वाघ, दत्तात्रय बोरुडे, संदीप काळे, संजय गुजर यांसारख्या आजी-माजी शिक्षकांनी उपस्थिती लावली. या मान्यवरांनी विद्यार्थ्यांना आपल्या शालेय जीवनातील प्रेरणादायी अनुभव सांगितले आणि त्यांच्या यशाबद्दल कौतुक केले. शिक्षक आणि विद्यार्थ्यांमधील हा संवाद मेळाव्याचा विशेष आकर्षणाचा भाग ठरला. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजनांचा सन्मान केला आणि त्यांच्या मार्गदर्शनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

हा स्नेह मेळावा केवळ शाळेच्या वर्गखोल्या, खेळाचे मैदान, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि मित्रांमधील त्या काळच्या गप्पा-टप्पा यांनी सर्वांच्या चेहऱ्यावर हसू फुलवले. या मेळाव्याने प्रत्येकाच्या मनात शालेय जीवनातील त्या सोनेरी काळाची स्मृती पुन्हा जागृत केली.

आठवणींना उजाळा देण्यापुरता मर्यादित नव्हता, तर यामुळे माजी विद्यार्थ्यांना आपल्या शाळेप्रती आणि शिक्षकांप्रती असलेली कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी मिळाली. प्रास्ताविक माजी विद्यार्थी बबन दुधाळ तर संतोष सातपुते यांनी सर्व उपस्थितांचे आणि आयोजकांचे आभार मानले. त्यांनी या मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व माजी विद्यार्थ्यांचे आणि शिक्षकांचे सहकार्य महत्त्वपूर्ण केले.

# आमदार निधीतून बनविलेला कॉँक्रिटीकरण रस्ता खोदला

## रस्ता बनवून देण्याची मागणी : गव्हाळे



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** रेल्वे स्टेशन भेवरी चाळ गवळीवाडा येथे माजी नगरसेवक विजय गव्हाळे यांनी आ. संग्राम जगताप यांच्या निधीतून सहा महिन्यापूर्वी संपूर्ण रस्ता कॉँक्रिटीकरण केला तेव्हा महापालिकेच्या पाणीपुरवठा विभाग व इतर विभागाने जमिनीखालचे कामे केलेली होती व आता पूर्ण झालेल्या रस्ता अचानक पणे कुठलीही परवानगी न घेता रस्ता खोदण्यात आला.

या अशा मनपा प्रशासनाच्या भोंगळ्या कारभारामुळे रस्त्याचे विद्रूपीकरण होत आहे. याला थांबवण्यासाठी प्रशासनाने कारवाई करण्यात यावी व रस्ते होण्यापूर्वीच कामे पूर्ण करण्यात यावी.

> शहरांमध्ये सध्या आ. संग्राम जगताप यांच्या निधीतून शहरांमध्ये विकास होत आहे व हे रस्ते पूर्ण तत्वावर झाले की मनपा प्रशासनाच्या पाणीपुरवठा विभाग हा रस्ता खोदून पाईपलाईनचे काम करते. मात्र या रस्त्याचे विद्रूपीकरण होऊन मोठ्या खड्ड्यात रूपांतर होते यामध्ये कोणतीही दुर्घटना घडते त्यामुळे रस्ता होण्यापूर्वी मनपा प्रशासनाने कामे पूर्ण करावी, व जिथे रस्ता खोदण्यात येईल, तेथे रस्ता बनवून देण्याची द्यावे.
>
> **– विजय गव्हाळे,** माजी नगरसेवक

# शिरसगाव परिसरात विजेचा लपंडाव?

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिरसगाव :** श्रीरामपूर तालुक्यातील शिरसगाव परिसरात विजेचा सारखा लपंडाव सुरु असून वीज येते आणि काही वेळात पुन्हा गायब होते. त्यामुळे शेतकरी हैराण झाले आहेत. त्यात चोरीचे प्रकार, बिबट्याची दहशत, पिकाचे भरणे वेळेवर होत नाही.

अवकाळी पावसाने तर फार नुकसान झाले आहे. वीजपुरवठा नसल्याने सर्व कार्यालयातील कामकाज बंद पडते, इन्टरनेट सेवा बंद असल्यास शासकीय योजनाचा लाभ घेता येत नाही विलंब होतो. विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज भरण्यास गैरसोय होते, हे सर्व वीज पुरवठा अभियंता यांना माहित असून योग्य त्या सूचना सबंधित वायरमन यांना मिळत नाही. वीज पुरवठा बंद पडला. तर उशिरा वायरमन लक्ष देतात. याकडे संबंधित अधिकारी लक्ष देतील काय? असा प्रश्न पडला आहे. सध्या वादळी पावसाचे वातावरण आहे.

# आ. ओगलेंच्या निधीतून श्रीरामपूरला मिळणार स्वर्गरथ

## करण ससाणे यांचे माहिती; पहिल्याच वर्षाच्या आमदार निधीतून दिले १५ लाखांचा निधी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर नगरपरिषदेला आमदार हेमंत ओगले यांच्या स्थानिक विकास निधीतून स्वर्गरथ मिळणार असून याकरिता सुमारे १५ लक्ष रुपयांचा निधी आ. हेमंत ओगले यांनी दिला असल्याची माहिती माजी उपनगराध्यक्ष करण ससाने यांनी दिली आहे.

सध्या श्रीरामपूर नगरपरिषदेकडे असलेल्या स्वर्ग रथाची दुरावस्था झाली असुन शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता नवीन स्वर्ग रथाची मागणी गेल्या अनेक वर्षापासूनची होती. श्रीरामपूर शहराची लोकसंख्या जवळपास एक लाखाहून अधिक असून शहराची व्याप्ती



देखील मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. याबरोबर श्रीरामपूर आणि देवळाली प्रवरा नगरपालिका तसेच श्रीरामपूर-राहुरी विधानसभा मतदारसंघातील अनेक महत्त्वपूर्ण विकास कामांना करोडो रुपयांचा निधी आमदार हेमंत ओगले यांनी उपलब्ध करुं दिला असून सदर कामांचे लवकरच भूमिपूजन आणी लोकार्पण होणार असल्याचे देखील ससाणे यांनी सांगितले.

> एकाच वेळेला अनेक ठिकाणी अंतयात्रा असल्यावर नागरिकांची स्वर्ग रथामुळे मोठी अडचण निर्माण होत होती, हिच जनहिताची मागणी आ. ओगले यांनी लक्षात घेता पहिल्याच वर्षाच्या आमदार स्थानिक विकास निधीतून १५ लक्ष रुपयेचा भरघोस निधी नवीन स्वर्गरथ खरेदी करणे करीता दिला आहे.
>
> **– करण ससाणे**

# करंजीत विरोधकांनी ग्रामसेवकाला धरले धारेवर

## ग्रामसभा कागदावर घेतल्याचा आरोप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी :** ग्रामसभा घेतली म्हणता मग ग्रामसभेचे प्रोसिडिंग कुठे आहे? झालेल्या ग्रामसभेचे व्हिडिओ फुटेज दाखवा, ग्रामसभेची गावाला सोडा ग्रामपंचायत सदस्यांना देखील ग्रामसभेची माहिती नाही, मग तुमची ग्रामसभा कागदावर झाली म्हणायची का? अशा शब्दात विरोधी गटाच्या ग्रामपंचायत सदस्यांनी गुरुवारी ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामसेवकाला चांगलेच धारेवर धरले.

सत्ताधाऱ्यांनी विरोधकांना विश्वासात न घेता ग्रामसभा घेतल्याची कुणकुण विरोधी गटाच्या ग्रामपंचायत सदस्यांना लागल्यानंतर विरोधी गटाच्या सदस्य रूपाली अकोलकर, अलका अकोलकर, संगीता अकोलकर, सुरेखा आहेर, नवनाथ आरोळे यांनी गुरुवारी ग्रामपंचायत कार्यालयात येऊन ग्रामसभेच्या मुद्द्यावरून ग्राम सेवकावर प्रश्नांचा भडीमार केला.

ग्रामसभा झाली असे म्हणता मग ग्रामसभा घेण्यासंदर्भात आम्हाला का कळवले नाही, सोशल मीडियावर ग्रामसभे संदर्भात मेसेज का टाकला नाही अथवा झालेल्या ग्रामसभेचे व्हिडिओ चित्रीकरण आम्हाला दाखवा. ग्रामसभा विरोधक या नात्याने आम्ही मांडणार आणि ते प्रश्न सोडवण्यासाठी संघर्ष सुद्धा करणार, अशा शब्दात ग्रामपंचायत सदस्य नवनाथ आरोळे यांनी या घटनेचा निषेध व्यक्त करत पुन्हा ग्रामसभा घेण्याचे सुचवले.

यावेळी ग्रामपंचायत कार्यालयात युवानेते आबासाहेब अकोलकर, शिवसेना उपजिल्हा प्रमुख रफिक शेख, माजी चेअरमन आसाराम अकोलकर, ग्राम पंचायत सदस्य अभय गुगळे, छत्रपती युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष विवेक मोरे, माजी चेअरमन उत्तम अकोलकर, बाबासाहेब मोरे, लाजरस क्षेत्रे, विश्वास क्षेत्रे, लहानू अकोलकर, संदीप अकोलकर, दिलीप आहेर आदी उपस्थित होते.

माजी सभापती बाळासाहेब अकोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली मागील पाच वर्ष आम्ही देखील सदस्य म्हणून सत्तेत होतो. मात्र कागदावर कधीच ग्रामसभा घेतली नाही. जाहीरपणे ग्रामसभेच्या माध्यमातून लोकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना लोकशाही मार्गाने उत्तर दिली. त्या प्रश्नांची सोडवणूक केली. तसेच ग्रामसभेची दोन दिवस अगोदर सर्व नागरिकांना कल्पना देत होतो. विरोधी सदस्यांना देखील विश्वासात घेत होतो.

**राहुल अकोलकर,** माजी ग्रामपंचायत सदस्य.

### पुन्हा ग्रामसभा घेऊ

२४ एप्रिल या दिवशी ग्रामसभा घेण्यात आली होती. आज काही ग्रामपंचायत सदस्यांनी विशेषतः विरोधी गटाच्या सदस्यांकडून पुन्हा ग्राम सभा घेण्याची सूचना करण्यात आल्याने १७ जून रोजी ग्राम सभा घेण्याचे ठरले आहे.

**कुमार गणगे ग्रामसेवक.**



# स्वा. आदिक स्मृतिदिनानिमित्त हृदयरोग तपासणी शिबीर

**जनता आवाज वृत्तसेवा**



**श्रीरामपूर :** स्वा. गोविंदराव आदिक यांच्या स्मृतिदिनानिमित्त महाराष्ट्र कृषक समाज संघटना,साखर कामगार हॉस्पिटल ट्रस्ट व आदिक परिवार यांच्या वतीने शहरातील साखर कामगार रुग्णालयात शनिवार दि. ७ जून रोजी सकाळी ११ ते ३ वाजेपर्यंत, हृदयरोग व रक्तदाब तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती महाराष्ट्र कृषक समाज संघटनेच्या अध्यक्षा तथा माजी नगराध्यक्षा अनुराधाताई आदिक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय सचिव तथा प्रवक्ते अविनाश आदिक यांनी दिली.

स्वा. गोविंदराव आदिक यांच्या स्मृतिदिनानिमित्त महाराष्ट्र कृषक समाज संघटना व आदिक परिवार यांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. या अगोदर मोफत हृदयरोग, अस्थिरोग, नेत्ररोग तपासणी व उपचार शिबिर घेण्यात आले आहेत. त्यांना उदंड प्रतिसाद मिळाला होता. याही वर्षी या शिबिरामध्ये प्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ. गौरव वर्मा हे रुग्णांची तपासणी करणार आहेत. तरी या शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी फायदा घ्यावा, असे आवाहन आदिक परिवाराच्यावतीने करण्यात आले आहे. शिबिरासाठी नाव नोंदणीसाठी गोपाल वायनदेशकर ९१७५६७४६३६, आदित्य आदिक व प्रसन्न शेटे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# जामखेड येथे आजपासून शिवराज्याभिषेक सोहळा

## भारूड, कीर्तन, भव्य मिरवणूकीचे कार्यक्रमांचे आयोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** सालाबादप्रमाणे याही वर्षी दि. ६ ते ९ जून दरम्यान जामखेड शहरात शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त शिवराज्याभिषेक उत्सव समिती जामखेडच्यावतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये भारूड, कीर्तन, रक्तदान शिबीर व भव्य दिव्य मिरवणूक या कार्यक्रमांचा समावेश आहे. या सर्व कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन राज्याभिषेक सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

स्वराज्याचे संस्थापक छत्रपती महाराज यांच्या राज्याभिषेक सोहळ्यानिमित्त आज शुक्रवार दि. ६ जून रोजी रात्री ८ ते १० भारूड सम्राट गोविंद महाराज गायकवाड भारूड मंडळ आळंदी देवाची यांचे तुफान विनोदी सोंगी भारूड, शनिवारी दि. ७ जून रोजी रात्री ८ ते १० वाजताचे दरम्यान संत एकनाथ महाराजांचे १४ वे वंशज हभप योगीराज महाराज गोसावी (पैठण) यांचे कीर्तन, रविवारी दि. ८ जून रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ पर्यंत भव्य रक्तदान शिबिर, तर रात्री ८ ते १० वाजताचे दरम्यान शिवशाहीर हभप कल्याण महाराज काळे (शेवगाव) यांचे कीर्तन होईल हे सर्व कार्यक्रम जामखेड शहरातील छत्रपती संभाजी महाराज मार्ग



तहसील कार्यालयाच्या समोर या ठिकाण होणार आहेत.

सोमवार दि. ९ जुन रोजी पहाटे सप्तनद्या, गडकोट किल्ले, तीर्थक्षेत्र येथून आणलेल्या पवित्र जलाने शिवछत्रपतींच्या मूर्तीवर अभिषेक करण्यात येईल. तर दुपारी २:१५ वाजता छत्रपती शिवाजी महाराज कृषी उत्पन्न बाजार समिती पासून श्री शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त भव्य दिव्य अशी मिरवणूक निघणार आहे.

# तिसगावला नियमित वीज पुरवठा होणार !

## मन्सूरभाई पठाण यांच्या आंदोलनाला यश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी :** पाथर्डी तालुक्यातील तिसगाव येथे सातत्याने वीज गायब होते. त्यामुळे नागरिकांसह छोट्या-मोठ्या व्यवसायिकांचे देखील मोठे नुकसान होते. महावितरणने तिसगावचा वीजपुरवठा नियमितपणे सुरू ठेवावा, कुठली तांत्रिक अडचण येऊ नये, यासाठी तिसगावचे सामाजिक कार्यकर्ते मन्सूरभाई पठाण यांनी वृद्धेश्वर चौकामध्ये गुरुवारी महावितरण विरोधात घंटानाद आंदोलन केले.

दुपारी या आंदोलकांची महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेट घेऊन तिसगावचा वीजपुरवठा नियमितपणे सुरू राहील, असे लेखी आश्वासन दिल्यानंतर मन्सुरभाई पठाण यांच्या आंदोलनाला या आश्वासनामुळे यश आले, असे म्हणावे लागेल. यावेळी पीआरपीचे तालुका अध्यक्ष प्रदीप ससाने, बहुजन समता पार्टीचे सतीश साळवे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे सचिन खंडागळे, डीपीआयचे शहराध्यक्ष सुनील उमाप, प्रगतशील शेतकरी संजय लवांडे पाटील,



उद्योजक प्रफुल्ल फिरोदिया यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये झालेल्या घंटानाद आंदोलना प्रसंगी तिसगावच्या वीज प्रश्न संदर्भात अनेकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

महावितरणचे कार्यकारी अभियंता मयुर जाधव, तिसगाव विभागाचे सहाय्यक अभियंता पंकज देवरे,करंजी विभागाचे सहाय्यक अभियंता राजेंद्र पालवे, योगेश वायकंडे, अजय कन्होजीया, गणेश सांगळे आदी प्रमुख अधिकारी यावेळी उपस्थित होते.

पाथर्डी येथून तिसगावसाठी स्वतंत्र एक्सप्रेस लाईन टाकून वीजपुरवठा करण्यात यावा तिसगाव एक मोठे व्यापारी बाजारपेठेचे शहर आहे. त्यामुळे या ठिकाणची आर्थिक उलाढाल लक्षात घेता या शहराला २४ तास नियमितपणे वीजपुरवठा होणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी महावितरणने प्रयत्न करावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते मन्सूरभाई पठाण यांनी यावेळी केली.

# देशभरातील पत्रकारांना मोफत आरोग्य सेवा

## 'व्हॉईस ऑफ मीडिया' देणार सेवा; शिर्डीतून प्रारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** जगभरातील पत्रकारांच्या आरोग्याची काळजी घेणारा एक ऐतिहासिक उपक्रम 'व्हॉईस ऑफ मीडिया' व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरम संघटनेने सुरू केला असून, संघटनेच्या सर्व पत्रकार सदस्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना मोफत आरोग्यसेवा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या महत्त्वाकांक्षी आरोग्य सेवेचा शुभारंभ महाराष्ट्रातील शिर्डी येथून झाला असून, लवकरच ही सेवा भारताच्या सर्व राज्यांत तसेच जगभरातील व्हॉईस ऑफ मीडिया नेटवर्क असणाऱ्या सर्व देशांमध्ये सुरू होणार आहे.

'व्हॉईस ऑफ मीडिया' ही आंतरराष्ट्रीय पत्रकार संघटना आणि आत्मा मालिक हॉस्पिटल (श्री विश्वात्मक जंगलीदास महाराज ट्रस्ट संचालित) यांच्यात नुकताच आरोग्य सेवा करार झाला आहे. या करारानुसार, सात ते आठ लाख पत्रकार सदस्य आणि त्यांच्या कुटुंबीयांसह एकूण ३० ते ३५ लाख नागरिकांना विविध वैद्यकीय सेवा पूर्णतः मोफत मिळणार आहेत.

या कराराची औपचारिक घोषणा 'व्हॉईस ऑफ मीडिया' व्ही ओ एम इंटरनॅशनल फोरमच्या राज्यस्तरीय पत्रकार कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी आत्मा मालिक हॉस्पिटलचे सीईओ श्री. सुनील पोकळे यांनी केली. या सामंजस्य करारावर आत्मा मालिक हॉस्पिटलच्या वतीने सुनील पोकळे, तर व्हॉईस ऑफ मीडियाच्या वतीने 'व्हॉईस ऑफ मीडिया' आरोग्य विंग प्रमुख भिमेश मुतूला यांनी स्वाक्षऱ्या केल्या.




# क्रांती साखर कारखान्याचे २० कामगार निवृत्त

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** देवीभोयरे येथील क्रांती साखर कारखान्याच्या सेवेत असलेले २० कामगार सेवेतून निवृत्त झाल्याने त्यांचा सेवापूर्ती सोहळा कारखान्याचे कार्यकारी संचालक दुर्वे यांच्या अध्यक्षतेखाली आणि प्रशासकीय अधिकारी माने व कामगार नेते शिवाजीराव औटी यांच्या प्रमुख उपस्थितीत कारण्यात आला.

यावेळी ज्येष्ठ कामगार नेते शिवाजीराव औटी यांनी कारखान्याचे दिवंगत कामगारांना प्रथम शब्द सुमनांजलीने श्रद्धांजली अर्पण केली. तर सध्या साखर कारखानदारी आलेले दिवस व त्यात राबत असलेल्या कामगारांच्या अवस्थेबाबत स्पष्ट मत मांडत, त्याविषयी ऊहापोह केला. तर सेवानिवृत्त कामगारांनी उर्वरित आयुष्य कसे व्यथित करावे, याबाबत अनुभव सांगत स्वच्छंदी व आनंदी जीवनाची गुरु किल्ली सांगत मार्गदर्शन केले.

क्रांती साखर कारखान्यातील इंजिनिअरिंग विभागातील रामभाऊ दिवटे, प्रकाश दळवी, सुरेश साळवे, विठ्ठल चौधरी, आनंदा बेलोटे, चंद्रकांत बेलोटे, रवि सोनवणे, भिवा मावळे, भाऊसाहेब शिंदे, यादव भालेकर, शेतकी विभागातील शिवाजी बेलोटे, संपत ढोमे, उत्पादन



विभागातील बाबाजी बांगर, भाऊसाहेब वाढवणे, गोविंद परंडवाल, कोंडिभाऊ करपे, बजरंग साळवे तर सुरक्षा विभागातील ज्ञानदेव सरडे, बाळू खोसे तर स्टोअर विभागातील दिलीप साबळे हे कामगार सेवानिवृत्त झाले.

यावेळी कारखान्याचे अधिकारी कैलास बरशिले, उमाकांत जाधव, लोखंडे, रमेश पुंडे, धामस्कर, गणेश झावरे, योगेश सोमवंशी, अजित मिसाळ, सुनिल मासाळ, दिपक वरखडे व इतर अधिकारी व कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पिंप्री लौकीत महिलांचा सत्कार



**जनता आवाज वृत्तसेवा**

**झरेकाठी :** संगमनेर तालुक्यातील आदर्श गांव पिंप्री लौकी अजमपुर ग्रामपंचायत मार्फत दिला जाणारा राजमाता अहिल्यादेवी पुरस्काराने अंगणवाडी सेविका वैशाली दत्तात्रय दातीर व आशा सेविका संगिता गुलशन कदम यांना सरपंच संगिता भारतराव गिते, उपसरपंच बाजीराव बबन गिते व ग्रामपंचायत सदस्य ग्रामसेविका श्रीमती काळे यांच्या उपस्थितित चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

या प्रसंगी राजमाता अहिल्यादेवीच्या प्रतिमेचे पुजन मान्यवरांच्या हस्ते झाले. याप्रसंगी भारतराव गिते यांनी राजमाता अहिल्यादेवीच्या कार्याला उजाळा देतांना राजमाता अहिल्या देवीच्या कार्याचा गौरव केला. राजमाता अहिल्यादेवी या उत्तम प्रशाशक होत्या त्यांनी ३०० वर्षापूर्वी मानव जातीच्या कल्याणासाठी अहोरात्र काम केले असल्याचे सांगितले.

# प्रवरा संस्था प्लेसमेंटमध्ये अव्वल स्थानावर

## मंत्री विखेंच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना नवनवीन तंत्रज्ञान देण्याचा प्रयत्न

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा रुरल इंजिनियरिंग कॉलेज लोणी येथील इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड कॉम्प्युटर इंजिनिअरिंग या आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित शाखेच्या विद्यार्थ्यांनी यंदा प्लेसमेंटच्या बाबतीत उल्लेखनीय यश संपादन करत विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय नामांकित कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांची निवड होऊन त्यांचे स्वप्न पुर्ण झाले आहे.

विद्यार्थ्यांना कॉग्निझंट, रॅनफोर्ड आयटी सोलूशन, टीसीएस, इन्फोसिस, क्वालिटी किऑस्क, यांसारख्या आघाडीच्या आयटी कंपन्यांमध्ये तसेच निबे एरोनॉटिकल अँड डिफेन्स, जाबील सर्किट, ऍकोलेड इलेक्ट्रॉनिक्स, सायरस या सारख्या कोअर आणि प्रोडक्ट-बेस्ड कंपन्यांमध्ये संधी मिळाल्या आहेत. यावर्षी प्लेसमेंटचे प्रमाण मागील वर्षाच्या तुलनेत ३० टक्क्याने वाढले आहे, जे ही शाखा उद्योगजगतात किती स्पर्धात्मक बनली आहे, अशी माहीती प्राचार्य डॉ. संजय गुल्हाने यांनी दिली.

इलेक्ट्रॉनिक्स आणि सॉफ्टवेअर या दोन्ही क्षेत्रांमध्ये संधी मिळाव्यात आणि डिजिटल युगातील औद्योगिक सुसंगत कौशल्ये मिळावीत. चार वर्षांच्या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना वर्कशॉप, इंटर्नशिप, प्रोजेक्ट्स, तसेच विविध राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय टेक स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची संधी देण्यात आली.

महाविद्यालय आता आगामी काळात या शाखेतील अभ्यासक्रम आणखी अद्ययावत करण्याच्या तयारीत आहे. नव्या टेक्नॉलॉजी व उद्योग संस्थांशी थेट संपर्क वाढवण्यासाठी आणखी प्रयत्न सुरू राहणार आहे. इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड कॉम्प्युटर इंजिनिअरिंग ही शाखा आता केवळ अभ्यासापुरती मर्यादित राहिलेली नाही, तर विद्यार्थ्यांसाठी करिअर घडवणारी एक मजबूत पायरी बनली आहे. या यशस्वी प्लेसमेंटमुळे ही शाखा सुरू करताना ठेवलेले उद्दिष्ट केवळ साकारच झाले नसून, भविष्यातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान ठरले आहे.

**- डॉ. संजय गुल्हाने, प्राचार्य**

उद्योग विश्वातील गरजेनुसार स्वतःला घडवले. इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड कॉम्प्युटर इंजिनिअरिंग ही शाखा प्रवरा रुरल इंजिनियरिंग कॉलेज लोणी व सदर डिपार्टमेंट मधील स्टाफ यांनी पुणे विद्यापीठात विकसित केली आहे, असा अभ्यासक्रम जेथे विद्यार्थ्यांना तांत्रिक कुशलता, समस्यांवर आधारित विचार, व उद्योगाच्या गरजेनुसार तयारी दिली जाते. आज त्या प्रयोगाला यश आले आहे.

# लाभार्थ्यांना २७ कोटी ९६ लाखांचे वितरण

## अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची मदत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ योजनेंतर्गत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात ८ हजार ४०२ लाभार्थ्यांना पूर्वसंमती देण्यात आली. त्यापैकी ३ हजार २८७ लाभार्थ्यांची प्रकरणे बँकेने मंजुरी केली आहेत. या लाभार्थ्यांना २७ कोटी ९६ लक्ष ६६ हजार रुपयांचे कर्ज बँकेमार्फत मंजूर करण्यात आले आहे. या कर्जापोटी लाभार्थ्यांना कर्ज प्रकरणांचा व्याज परतावाही महामंडळामार्फत देण्यात आला आहे, अशी माहिती अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक अमोल बोठे यांनी दिली.

आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या घटकातील, प्रामुख्याने मराठा प्रवर्ग आणि ज्या प्रवर्गासाठी स्वतंत्र महामंडळ अस्तित्त्वात नाही, अशा प्रवर्गातील बेरोजगार युवक-युवतींच्या उद्योग व्यवसायाला हातभार लावून त्यांना सक्षम बनविण्यासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत व्याज परतावा योजना राबविल्या जातात. वैयक्तिक कर्ज व्याज परतावा आणि गट कर्ज व्याज परतावा अशा दोन वेगवेगळ्या योजनांचा यामध्ये समावेश आहे.

# कर्जतमध्ये पर्यावरण जनजागृती कार्यक्रम

## फळझाडे, औषधी वनस्पती व छायादायक वृक्षांचे रोपण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून सर्वसामाजिक संघटना व नगरपंचायत कर्जत यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य महावृक्षारोपण व पर्यावरण जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी साई मंदिर परिसरात झाली. जिथे अनेक प्रकारची फळझाडे, औषधी वनस्पती व छायादायक वृक्षांचे रोपण करण्यात आले. विशेष म्हणजे गेल्या एक हजार सातशे दिवसांपासून सातत्याने सामाजिक कामात सक्रीय असलेल्या सर्वसामाजिक संघटनांच्या शिलेदारांनी या उपक्रमात पुढाकार घेतला. त्यांच्या कार्यकर्तृत्वामुळे परिसरात हरितक्रांती घडवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

यावेळी कर्जत नगरपंचायतच्या नगराध्यक्षा रोहिणी घुले, उपनगराध्यक्ष संतोष मेहेत्रे, मुख्याधिकारी अक्षय जायभाय, माजी जि. प. सदस्य प्रवीण घुले, माजी नगराध्यक्ष नामदेव राऊत, नगरसेवक भाऊसाहेब तोरडमल, सतीश पाटील, सुनील शेलार, लालासाहेब शेळके, देविदास खरात, रवींद्र सुपेकर, नगरसेविका छायाताई शेलार, रोटरी क्लब ऑफ कर्जत सिटीचे अध्यक्ष राजेंद्र जगताप, समर्थ विद्यालयाचे प्राचार्य चंद्रकांत राऊत यांच्यासह राजकीय सामाजिक शैक्षणिक क्रीडा क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित होते. पर्यावरणाविषयी कर्तव्य, जबाबदारी आणि जाणीव याबाबतची जनजागृती ही काळाची गरज असून आजच्या घडीला पर्यावरण वाचले तरच मनुष्य वाचू शकेल, यासाठी पर्यावरणाबाबत सर्वांनी सजग होऊन पर्यावरण संवर्धन ही एक लोकचळवळ ठरावी. असे प्रतिपादन सर्व सामाजिक संघटनेचे शिलेदार सेवानिवृत्त वनाधिकारी अनिल तोरडमल यांनी केले.

पर्यावरण संवर्धनाच्या या कार्यात सर्व सामाजिक संघटनेबरोबर कर्जत नगरपंचायत ही सर्वार्थाने सहभाग घेऊन पर्यावरण समृद्धीच्या बाबतीत कर्जतचा लौकिक वाढविण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहील असे नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, मुख्याधिकारी व नगरसेवक यांनी कटिबद्ध असल्याचे सांगितले.

गेल्या साडेचार वर्षांपासून ऊन,वारा, पाऊस, सणवार,उत्सव किंवा कोरोना काळात देखील कुठल्याही गोष्टीत खंड न पडू देता सलग श्रमदान करून पर्यावरण समृद्धीकडे कर्जतची वाटचाल होत आहे. यात लिहिल्या जाणाऱ्या इतिहासात सर्व सामाजिक संघटनेचा इतिहास सुवर्ण अक्षरांनी लिहिला जाईल असे मत अनेक वक्त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिल तोरडमल यांनी केले तसेच उपस्थितांचे आभार भाऊसाहेब रानमाळ यांनी मानले.



## संपादकीय

# विराट विजय!

तमाम भारतीयच नव्हे तर ५० कोटीहून अधिक विश्व क्रिकेटप्रेमींचे लक्ष असलेल्या १८ व्या टाटा आयपीएल - २०२५ स्पर्धेच्या, ३ जून रोजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या अटीतटीच्या टी २० अंतिम सामन्यात रॉयल चॅलेंजर बेंगळुरू संघाने पंजाब किंग्ज संघावर सनसनाटी विजय मिळवून करंडक जिंकला. आजवर ह्या मैदानावर झालेल्या तिसऱ्या अंतिम आणि अतिशय रोमहर्षक सामन्यात आयपीएल चषक जिंकण्याचे पंजाब किंग्ज संघाचे स्वप्न शेवटी अधुरेच राहिले. या दोन्ही संघांनी आजवर झालेल्या कोणत्याही आयपीएल स्पर्धेचा चषक जिंकलेला नव्हता, त्यामुळे दोन्ही संघांनी विजयासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. गुजरातचा संघ अंतिम सामन्यात नसल्याने स्टेडियममधील दर्शकांचा उत्कृष्ट खेळासाठी दोन्ही संघांना पाठिंबा असणार हे निश्चितच होते. नरेंद्र मोदी स्टेडियमवर जमलेल्या हजारो दर्शकांना ज्याची धाकधुक लागून राहिली होती त्या पावसाने सामन्यादरम्यान व्यत्यय आणला नाही, हे विशेष म्हणावे लागेल. फलंदाजीस अनुकूल असलेल्या या खेळपट्टीवर नाणेफेक जिंकलेल्या संघाचा कर्णधार प्रथम फलंदाजी करण्यास प्राधान्य देईल हे निश्चित होते. यापूर्वी, खेळल्या गेलेल्या ८ लढतीमध्ये २०० धावांचा टप्पा ओलांडला गेला, त्यात प्रथम फलंदाजी करणाऱ्या संघांनी ६ वेळा विजय प्राप्त केला. परंतु बेंगळुरू संघाचा कर्णधार श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकूनही प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा आश्चर्यजनक निर्णय घेतला. ९ एप्रिलला सुरू झालेल्या या स्पर्धेचे सामने भारताच्या ६ प्रमुख शहरांमध्ये घेतले गेले. आयपीएल स्पर्धेत बेंगळुरू संघ आजवर २००९, २०११, २०१६ आणि २०२५ अशा चारवेळा अंतिम सामन्यासाठी पात्र ठरला होता, तर पंजाबचा संघ २०१४ आणि आता २०२५ मध्ये अंतिम सामना खेळत होता. या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत अंतिम सामना खेळणाऱ्या  दोन संघांमध्ये आजवर खेळल्या गेलेल्या ३६ सामन्यांपैकी दोन्ही संघांनी १८- १८ सामने जिंकले होते, यावरून अंतिम सामन्यासाठी दोन्ही संघांना प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागणार हे निश्चितच होते. दोन्ही संघांनी प्रत्येकी १४ साखळी सामने खेळून ९ सामन्यात १९ गुणांसह विजय मिळवला, तर ४ सामने गमावले. या दोन संघांच्या रन रेटमध्ये + ०७१ इतकाच फरक होता. ही या अंतिम सामन्याची चुरस दाखवणारी वैशिष्ट्ये म्हणावी लागतील. अखेर बेंगळुरु संघाने त्यांचा १८ वर्षाचा दुष्काळ संपवत करंडकाला हात घातला. या पूर्ण स्पर्धेदरम्यान बेंगळुरू संघाचा कर्णधार रजत पाटीदार असला तरी महत्वाचे निर्णय घेताना तो विराट कोहलीशी सतत सल्ला मसलत करत होता, त्यामुळे या स्पर्धेच्या विजेतेपदाचे श्रेय कोहलीला जाते.

तुलनेने पाहिले तर तुल्यबळ वाटणारे पंजाब आणि बेंगळुरू हे दोन्ही संघ यंदाच्या मोसमात तीनवेळा आमने सामने आले, यात बेंगळुरूने दोनवेळा बाजी मारली होती. क्वालिफायर - १ लढतीत पंजाबने केवळ १०१ धावांचे आव्हान बेंगळुरूसमोर ठेवत सपशेल शरणागती पत्करली. हा सामना हरल्यानंतर प्रसार माध्यमांशी बोलताना पंजाबचा कर्णधार श्रेयस अय्यर म्हणाला होता, फलंदाजीतील अपयशामुळे झालेल्या पराभवावर जास्त चर्चा न करता फलंदाजांना मी त्यांचा नैसर्गिक खेळ खेळण्याचा सल्ला दिला आहे. नवोदित खेळाडूंवर दडपण आणून त्यांना त्यांच्या आक्रमक खेळापासून दूर ठेवणे मी उचित मानत नाही. बेंगळुरूचा संघ पहिल्या प्ले ऑफमध्ये पंजाबला सहज धूळ चारून थेट अंतिम फेरीत पोहोचला असला तरी मुंबईसारख्या बलाढ्य संघाला पंजाबने पराभवाचा कडवा डोस पाजला, हे अंतिम सामना खेळताना बेंगळुरूच्या संघाला विसरून चालणार नव्हते. पण विजयाची प्रेरणा त्यांना अंतिम विजय प्राप्त करण्यास उपयोगी पडली असे म्हणावे लागेल. बेंगळुरू संघाच्या फलंदाजीची मदार या स्पर्धेत सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विराट कोहली आणि फील सॉल्ट या दोन फलंदाजांवर, तर पंजाब संघाची मदार श्रेयस अय्यर आणि प्रभसिमरन सिंग या दोन खेळाडूंवर होती. खास करून मुंबई विरुद्धच्या सामन्यात अश्विनीकुमारने टाकलेल्या १९ व्या षटकात श्रेयस अय्यरने चार षटकार ठोकले होते. त्याने नाबाद रहात ८७ धावांची खेळी केली होती. त्यामुळे त्याच्याकडून तशाच फलंदाजीची अपेक्षा होती. गोलंदाजीत सातत्याने यश मिळवणाऱ्या अर्शदीप सिंग आणि मार्को यान्सेन यांच्यावर पंजाबची तर जोश डेझलवूड आणि कुणाल पंड्या या खेळाडूंवर बेंगलुरूची दारोमदार होती. तुलनात्मक अभ्यास करता बेंगळुरू संघाला ही स्पर्धा जिंकण्याची जास्त संधी होती. २०-२० मर्यादित षटकांच्या सामन्यांमध्ये, फलंदाजी आणि गोलंदाजीचा समन्वय आणि त्याला क्षेत्ररक्षणाची मिळालेली साथ हे हमखास यशाचे ठरणारे गणित बेंगळुरू संघाने या अंतिम सामन्यातही खरे करून दाखवले.  क्रिकेट इज द गेम ऑफ चान्स  या म्हणीची संपूर्ण स्पर्धेत जाणवलेली प्रचिती अंतिम सामन्यातही जाणवली. फलंदाजीला पोषक अशी खेळपट्टी असल्याने, पहिल्या ५ - ६ षटकांमध्ये जो संघ जास्त धावा करेल त्याला जिंकण्याची संधी जास्त असेल, असे तज्ञांचे मत होते. स्पर्धेमध्ये बंगळुरूच्या विराट कोहली आणि फिल सॉल्ट या सलामीवीरांकडून केली गेलेली आकर्षक फटकेबाजी अंतिम सामन्यातही अपेक्षित होती. परंतु तिसऱ्याच चेंडूवर सनसनाटी षटकार ओढत धडाकेबाज खेळाची सुरुवात करणारा  सॉल्ट दुसऱ्या षटकातही एक षटकार ओढून झेलबाद झाला. त्यांच्याजागी आलेला मंचक आगरवालही कोहलीची साथ न  देता लवकर परतला. त्यानंतर आलेल्या कर्णधार पाटीदार आणि कोहलीने सावध खेळ करत धावफलक हलता ठेवला. संघाच्या ९३ धावा फलकावर लागल्या असताना कर्णधार पाटीदार यॉर्करवर पायचीत झाला. मधल्या फळीतील फलंदाजांच्या साथीने कोहलीने संयमी खेळ करत ११ व्या षटकात संघाच्या १०० धावा फलकावर लावल्या. १४ व्या षटकात संघाची धावसंख्या १३१ असताना दुर्दैवाने तो बाद झाला. त्यानंतर कमी षटके राहिल्याने धावफलक हलता ठेवण्याच्या नादात ठराविक अंतराने बेंगळुरू संघाचे बळी गेले आणि त्याचा डाव १९० धावांवर आटोपला प्रभासीम्रनच्या साथीने पंजाबच्या डावाची सुरुवात करणाऱ्या प्रियांश आर्याने पहिलाच चेंडू सीमापार धाडत धडाकेबाज सुरुवात केली. दोघांनी भुवनेश्वर कुमारच्या पहिल्याच षटकात १३ धावा वसूल केल्या. तिसऱ्या षटकात प्रभासीम्रनचा झेल सोडून त्याला शेपर्डने जीवदान दिले.

# शुभमन आणि नवख्या खेळाडूंची कसोटी

**नोंद**

**- श्रीकृष्ण जोशी**

भारताच्या कसोटी संघाला कर्णधार म्हणून लाभलेल्या शुभमन गिल हा गुणी आणि संयमी खेळाडू आहे. एक आघाडीचा निडर फलंदाज आणि संयमी कर्णधार म्हणून चाहते आणि बीसीसीआयच्या शुभमनकडून खूप अपेक्षा आहेत. मात्र नवखे सहकारी खेळाडू बरोबर घेऊन इंग्लंडसारख्या मातब्बर संघाविरुद्ध खेळताना त्याची खरी कसोटी लागणार आहे. कसा रंगेल हा हाय वोल्टेज ड्रामा?

साधारण सत्तरच्या दशकापर्यंत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये केवळ पाच दिवसांचे कसोटी सामने खेळले जात होते. त्यानंतर  क्रिकेटरसिकांना ५० षटकांच्या एकदिवसीय सामन्यांचे वेड लागले. २००५ मध्ये, ज्याचे वर्णन केवळ 'मारधाड क्रिकेट' असेच करता येईल, असा वीस-वीस षटकांचा क्रिकेट प्रकार सुरू झाला. कसोटी क्रिकेटमध्ये खेळाडूंमध्ये जो संयम, जी एकाग्रता दिसायची आणि जे शास्त्रशुद्ध क्रिकेट खेळले जायचे, ज्याला  जंटलमन्स गेम म्हटले जायचे, ते थोडे कमी दिसू लागले. एकदिवसीय सामन्यांपर्यंतदेखील क्रिकेटची अवस्था ठीक होती, पण वीस षटकांच्या सामन्यांमधली हाणामारी क्रिकेटमध्ये आली आणि केवळ तडाखेबंद फलंदाजी आणि येनकेनप्रकारेन जास्तीत जास्त धावांचा डोंगर उभा करणे याकडे खेळाचा कल झुकला. काही वेळेस फलंदाजी करणाऱ्या संघांना या पावित्र्याचा फायदा झाला पण बहुतेक वेळा दिग्गज म्हणवणारे फलंदाज अतिशय किरकोळ धावसंख्येवर मैदानातून परतलेले पाहायला मिळू लागले.

भारतीय कसोटी क्रिकेटला अजित वाडेकर, सुनील गावसकर, सचिन तेंडुलकर, राहुल द्रविड आणि विराट कोहलीसारख्या शास्त्रशुद्ध फलंदाजांची परंपरा लाभली आहे. आवश्यक असेल तेव्हा आपल्या तडाखेबाज फलंदाजीचे दर्शनही त्यांनी घडवले. आपल्या कौशल्याच्या बळावर त्यांनी संघाचे कर्णधारपदही भूषवले. आज वीस-वीस षटकांचे आंतरराष्ट्रीय सामने आणि आयपीएलसारख्या स्पर्धांमधून कैक गुणी, उदयोन्मुख आणि मेहनती खेळाडू भारताला लाभले. पण कसोटी, एकदिवसीय सामने आणि मर्यादित वीस-वीस षटकांचे सामने अशा तीनही सामन्यांच्या प्रकारांमध्ये सातत्यपूर्ण कामगिरी करणारे बोटावर मोजता येतील असेच खेळाडू सांगता येतील. असाच पंजाबचा गुणी आणि सातत्यपूर्ण कामगिरी करणारा २५ वर्षीय शुभमन गिल २० जून रोजी लीड्स येथे इंग्लंडविरुद्धच्या पाच सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या कसोटी सामन्यातून भारताचा ३५ वा कसोटी कर्णधार म्हणून खेळेल. रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्या कसोटी क्रिकेटमधील निवृत्तीनंतर आता शुभमन गिलच्या कर्णधारपदाने भारतीय कसोटी क्रिकेटच्या नव्या अध्यायाला सुरुवात झाली आहे. जाहीर झालेल्या कसोटी संघांमध्ये अनेक नवख्या खेळाडूंना संधी देण्यात आली आहे, शिवाय भारताचा स्टार गोलंदाज मोहम्मद शमीला दुखापत झाली असल्याने संघात स्थान मिळालेले नाही. रोहित शर्मा आणि विराट कोहलीच्या अनुपस्थितीत मोहम्मद शमी कसोटी संघात नसणे हा भारतीय संघाला मोठा झटका म्हणावा लागेल. शमीला कसोटीमध्ये मोठा अनुभव असल्याने त्याचा फायदा शुभमनला गोलंदाजीमध्ये आणि कर्णधार म्हणून निर्णय घेताना नक्कीच झाला असता.

या सर्व ज्येष्ठ खेळाडूंशिवाय शुभमनच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ इंग्लंडच्या आव्हानाला कसा सामोरा जातो याकडे संपूर्ण क्रिकेटविश्वाचे लक्ष लागले आहे. कर्णधारपदासाठी जसप्रीत बुमराह आणि हार्दिक पंड्याबरोबर शुभमनची स्पर्धा होती. ८ सप्टेंबर १९९९ रोजी पंजाबच्या फाजिल्का गावात जन्मलेल्या गिलने २०१८ च्या आयसीसी १९ वर्षाखालील विश्वचषकात १०४.५० च्या सरासरीने ४१८ धावा करत प्रसिद्धी मिळवली. शानदार कामगिरीसाठी त्याला स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू म्हणून घोषित करण्यात आले, आणि तेव्हापासून चाहत्यांच्या त्याच्याकडून असलेल्या अपेक्षा वाढत गेल्या. त्यामुळे कसोटी संघाचा कर्णधार म्हणून शुभमनच्या कामगिरीकडे भारतीय क्रिकेटरसिकांचे लक्ष असेल. शुभमन गिलने डिसेंबर २०२० मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केले. त्याने आजवर ३२ सामन्यांमध्ये ३५.०५ च्या सरासरीने १,८९३ धावा केल्या आहेत त्यात पाच शतकांचा समावेश आहे. हा विक्रम करताना विराट कोहलीचा विक्रम मोडत २५ वर्षांपेक्षा कमी वयात पाच कसोटी शतके झळकावणारा तो सर्वात तरुण भारतीय खेळाडू ठरला. शुभमनने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एकूण १४ शतके झळकावली आहेत. यामध्ये कसोटी क्रिकेटमध्ये पाच, एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये आठ आणि टी ट्वेंटी आंतरराष्ट्रीय (२०) सामन्यांमधील एका शतकाचा समावेश आहे.



शुभमन हा सध्याच्या घडीला भन्नाट फॉर्ममध्ये आहे. कारण सातत्यपूर्ण कामगिरी करत त्याने अशी एक कामगिरी केली आहे, जी आतापर्यंत ती कोणालाच जमलेली नाही. कारण गिलचा एक अनोखा विक्रम आता समोर आला आहे. तो एकदिवसीय क्रिकेटमध्ये ५० डावांमध्ये सर्वात जलद २,५०० धावा करणारा फलंदाज ठरला. शुभमन गिलने १९ वर्षांखालील क्रिकेटमध्ये उत्कृष्ट प्रदर्शन केले. २०१८ च्या आयसीसी अंडर-१९ विश्वचषक स्पर्धेत त्याने सर्वाधिक धावा करून 'प्लेअर ऑफ द टूर्नामेंट'चा किताब जिंकला आणि भारताच्या विश्वचषक विजयात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. कसोटी क्रिकेटव्यतिरिक्त शुभमनने एकदिवसीय तसेच वीस षटकांच्या सामन्यांमधूनही सातत्यपूर्ण कामगिरी करत ठसा उमटवला आहे. गुजरात टायटन्स संघासाठी दोन हजार धावा पूर्ण केल्या, तेव्हा हा टप्पा गाठणारा तो पहिला खेळाडू ठरला. शुभमन गिलने अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर एक हजार  धावा पूर्ण केल्या आणि हा विक्रम करणारा तो पहिला खेळाडू ठरला. ४८३ धावा कुटल्यानंतर आयपीएल २०२२ मध्ये गुजरात टायटन्सच्या जेतेपदाच्या मोहिमेत तो एक महत्त्वाचा खेळाडू ठरला.

कर्णधारपदासाठी आवश्यक असलेला महत्वाचा गुण म्हणजे उत्कृष्ट क्षेत्ररक्षण. मैदानाच्या बाह्य क्षेत्रात क्षेत्ररक्षण करणे तो पसंद करतो. चेंडूची अचूक फेक करण्यात तो माहिर आहे. फेब्रुवारी २०२५ मध्ये भारत आणि इंग्लंड संघांमध्ये खेळल्या गेलेल्या एकदिवसीय मालिकेमध्ये टीम इंडियाचा स्टार खेळाडू शुभमन गिलच्या या गुणाची चुणूक दिसली. या मालिकेसाठी आणि चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी संघाचा नवीन उपकर्णधार म्हणून शुभमन गिलला निवडण्यात आले. गिलचे उत्कृष्ट क्षेत्ररक्षण या मालिकेत दिसून आले. या मालिकेचया कटक येथे झालेल्या दुसऱ्या सामन्यात खेळताना शुभमन गिलने मोठी भूमिका बजावली. आपल्या उत्कृष्ट क्षेत्ररक्षणाद्वारे त्याने तीन फलंदाजांना पॅव्हेलियनमध्ये परत पाठवले. विराट कोहली हा भारताचा सर्वात यशस्वी कसोटी कर्णधार आहे. त्याने ५८.८२ सरासरीने ६८ पैकी ४० कसोटी सामने जिंकले आहेत. कर्णधार म्हणून शुभमनकडून भारतीय क्रिकेटरसिकांची अशाच प्रकारच्या कामगिरीची अपेक्षा असेल. कोहलीने कसोटी कर्णधार म्हणून ५४.८० च्या सरासरीने ५८६४ धावा केल्या. कर्णधार म्हणून २०१९ मध्ये त्याने पुण्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध नाबाद २५४ धावांची खेळी केली. ही त्याची सर्वोच्च धावसंख्या ठरली. कर्णधारपदाचे दडपण न घेता अशा मोठ्या खेळी करण्याची क्षमता शुभमन गिल बाळगून आहे.

शुभमनला अनेक ज्येष्ठ क्रिकेटपटूंनी मार्गदर्शन केले आहे. त्याला अनुसरून त्याने आपल्या कारकिर्दीत चांगली प्रगती केली आहे. कसोटी संघाचा कर्णधार झाल्यावर मनोगत व्यक्त करताना खेळाडूंनी दबाव आणि अपयश टाळण्यासाठी शांत आणि स्थिर राहणे महत्त्वाचे आहे, कारण या दोन्ही गोष्टी खेळाडूंच्या कामगिरीवर नकारात्मक परिणाम करतात असे तो म्हणतो. या बाबतीत तो महेंद्रसिंग धोनीला आदर्श मानतो. ज्येष्ठ खेळाडूंनी दिलेल्या सल्ल्यानुसार संघातील इतर खेळाडू आणि त्यांच्या गरजांकडे लक्ष देणे तो महत्वाचे मानतो; जेणेकरून संघाला यश मिळवता येईल. मोठे निर्णय घेताना ताण न बाळगता शांतपणे निर्णय घ्यायला तो प्राधान्य देतो, कारण यामुळे चुकांची शक्यता कमी होते. प्रत्येक खेळीच्या वेळी केलेल्या चुकांपासून शिकायची आणि सुधारण्याची शुभमनची तयारी असते. स्वतः वर त्याचा दृढ विश्वास असून तो नेहमी सकारात्मक दृष्टिकोनाला प्राधान्य देतो. कर्णधार नसतानाही संघातील सदस्यांशी त्याने चांगले संबंध निर्माण केले. यामुळे त्याला सहकाऱ्यांमध्ये संघिक वृत्ती जोपासण्यास मदत होईल. आता त्याच्यावर नवी मोठी जबाबदारी आली आहे. ती तो कशी पेलतो हे पहायचे.

# थोरात कारखान्याच्या मिल रोलरचे पूजन

## परमेश्वराच्या आशीर्वादाने कारखान्याची वाटचाल सुरु : बाळासाहेब थोरात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : ऊस आणि दूध हे शाश्वत पीक असून एकरी उत्पादन वाढीसाठी आगामी काळात नवीन ए आय तंत्रज्ञानाचा वापर करणार आहोत. संगमनेर तालुका हे कुटुंब असून यश मिळवण्यासाठी कष्ट हे करावेच लागतात. परमेश्वराच्या आशीर्वादाने कारखान्याची व सहकाराची चांगली वाटचाल सुरू असल्याचे प्रतिपादन माजी कृषी व महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२५-२६ या गळीत हंगामासाठी पहिल्या मिल रोलर चे पूजन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी उपाध्यक्ष पांडुरंग घुले, रणजीतसिंह देशमुख, संपतराव डोंगरे, सुधाकर जोशी, लक्ष्मणराव कुटे, संचालक संपतराव गोडगे, इंद्रजीत भाऊ थोरात, डॉ. तुषार दिघे, विनोद हासे, रामदास धुळगंड, विलास शिंदे, रामनाथ कुटे, नवनाथ आरगडे, विजय राहणे, गुलाब देशमुख, अरुण वाकचौरे, योगेश भालेराव, अंकुश ताजने, दिलीप नागरे, लता बाबासाहेब गायकर, सुंदराबाई रावसाहेब डूबे, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर, सेक्रेटरी किरण कानवडे आदी उपस्थित होते.

माजी कृषिमंत्री थोरात म्हणाले की, साखर कारखानदारी मध्ये प्रत्येक हंगाम हा आव्हानाचा आणि कष्टाचा असतो.

> सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या आदर्श तत्वावर कारखान्याची वाटचाल सुरू असून लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी काळात शेतकरी सभासद कर्मचारी हे सर्व मिळून एकत्रितपणे चांगले काम करणार आहोत.
>
> **- पांडुरंग घुले**




> यावर्षी कार्यक्षेत्रामध्ये कमी ऊस असल्याने आव्हान मोठे आहे. चांगला भाव देण्यासाठी कार्यक्षेत्रात जास्त ऊस उत्पादन होणे गरजेचे आहे. कारखान्याने ऊस उत्पादन वाढीकरता विविध अनुदान योजना सुरू केल्या असून सेंद्रिय खत सुद्धा उपलब्ध आहे. आगामी गाळपाच्या पूर्वतयारीच्या दृष्टीने मशीनचे ओव्हर ऑइलिंगची सर्व कामे, ऊस तोडणी, वाहतूक, मजूर ही सर्व कामे योग्य वेळेत पूर्ण करणार आहे.
>
> **- जगन्नाथ घुगरकर**

व्यवस्थापन, अधिकारी, कर्मचारी हे सर्व कुटुंब असून सर्वांनी ज्याचे त्याचे काम चांगले केल्याने यश मिळत असते. शरीराच्या अवयवाप्रमाणे कारखान्याचा प्रत्येक पार्ट महत्त्वाचा असून हाफ सीजनमध्ये सतर्क राहून प्रत्येक गोष्टीची काळजी घ्यावी लागते.

याप्रसंगी विष्णू ढोले, रामनाथ शिंदे, नामदेव शिंदे, बाबजी वामन, संभाजी वाकचौरे, शिवाजी जगताप, प्रा. बाबा खरात, अनिल सोमणी, अशोक मुटकुळे, नवनाथ गडाख, भाऊसाहेब खर्डे, अशोक कवडे आदींसह सर्व विभाग प्रमुख कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांनी केले. सूत्रसंचालन नामदेव कहांडळ यांनी केले. तर व्हा. चेअरमन पांडुरंग घुले यांनी आभार मानले.

# वसुंधरेच्या संवर्धनासाठी गो ग्रीनचा पर्याय निवडा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : दरमहा छापील कागदी बिला ऐवजी ई-मेलद्वारे वीज बिल स्वीकारण्याच्या गो ग्रीन सेवेचा पर्याय  निवडल्यानंतर ग्राहकांना तत्काळ वीज बिलात एकरकमी १२० रुपये सूट महावितरणकडून दिली जात असून वसुंधरेच्या संवर्धनासाठी ग्राहकांनी गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडावा, असे आवाहन महावितरणने ग्राहकांना केले आहे.

महावितरणकडून कागद वाचवा, पर्यावरण वाचवा या संकल्पनेनुसार गो-ग्रीन सेवा राबविण्यात येत आहे. गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडणाऱ्या ग्राहकांना महावितरणकडून दरमहा छापील कागदी बिला ऐवजी ई - मेल द्वारे वीज बिल पाठविण्यात येते. शिवाय पहिल्याच वीज बिलात पुढील बारा महिन्यासाठी तत्काळ १२० रूपये एकरकमी सवलत देण्यात येते.  महावितरणच्या राज्यातील ३ कोटी लघुदाब ग्राहकांपैकी अद्यापपर्यंत ६ लाख १६ हजार ग्राहकांनी गो ग्रीन सेवेचा पर्याय निवडला आहे. यामध्ये नाशिक मंडळातील २५ हजार ३५३, मालेगाव मंडळातील ४ हजार ९४ आणि अहिल्यानगर मंडळातील १९ हजार ६ वीज ग्राहक म्हणजे नाशिक परिमंडळातील एकूण ४८ हजार ४५३ ग्राहकांनी गो-ग्रीन सेवेचा लाभ घेतला आहे.  भविष्यात हे प्रमाण वाढावे, या हेतूने महावितरणने गो ग्रीन पर्याय निवडणाऱ्या ग्राहकांना वीजबिलात तत्काळपणे १२० रुपये  एकरकमी सुट देण्याचा निर्णय घेतला.

पान १ वरून   पान १ वरून   पान १ वरून

## पर्यावरण संवर्धन हे प्रत्येकाचे मूलभूत कर्तव्य

धुळगंड, विलास शिंदे, रामनाथ कुटे, नवनाथ आरगडे, विजय राहणे, अरुण वाकचौरे, योगेश भालेराव, अंकुश ताजने, दिलीप नागरे, लता बाबासाहेब गायकर, सुंदराबाई दुबे, आनंद वर्पे, बाळासाहेब सावंत, बाळासाहेब फापाळे, किरण कानवडे, शिवाजी खुळे, रामनाथ शिंदे आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी कारखाना परिसरामध्ये व तालुक्यातील विविध गावांमध्ये वृक्षारोपण करण्यात आले. कोरोना संकटामध्ये ऑक्सिजनची कमतरता आणि अनन्य साधारण महत्व संपूर्ण जगाने अनुभवले. वृक्ष हे आपल्याला २४ तास मोफत ऑक्सिजन देत असतात. त्यांचे संवर्धन हे केलेच पाहिजे.याचबरोबर प्लॅस्टिकचा वापर कमी करणे हेही अत्यंत महत्त्वाचे असल्याचे ते म्हणाले. तर रणजीतसिंह देशमुख म्हणाले की, संगमनेर तालुक्याप्रमाणे कृषीप्रधान भारत देशामध्ये पर्यावरण संवर्धन ही लोक चळवळ उभी राहिली पाहिजे. दंडकारण्य अभियान ही संगमनेर तालुक्याची ओळख बनली आहे. येणाऱ्या वर्षांमध्ये प्रत्येकाने या अभियानामध्ये सक्रिय सहभाग घेऊन कमीत कमी दोन वृक्ष रोपण व त्याचे संगोपन करावे असे आवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आदिवासी सेवक प्रा. बाबा खरात यांनी केले .तर कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांनी आभार मानले. यावेळी कार्यकर्ते पदाधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मांडओहळच्या दुरुस्तीला २० कोटी?

यांच्या उपस्थितीत जलसंपदा विभागाचे सचिव दिपक कपूर यांच्यासह सर्व सबंधित अधिकाऱ्यांची मंत्रालयामध्ये बोलविलेल्या बैठकीत या कामांचे सादरीकरण करण्यात आले व चर्चेतून निर्णय घेण्यात आला. जलसंपदा मंत्री विखे पाटील यांनी जलसंपदा विभागाला सव्वीस किलोमीटर लांबीच्या कालवा दुरुस्ती अस्तरीकरण व वितरिका दुरुस्ती २० कोटी रुपयांच्या कामांना प्रशासकीय मंजुरी देण्याचे आदेश दिले. पारनेर हा सततचा दुष्काळी तालुका आहे. त्यामुळे तेथे जलसिंचनाचे जेवढे जास्तीत जास्त स्रोत निर्माण करता येतील. तेवढे प्राधान्य या कामाला अधिकाऱ्यांनी द्यावे.

गोदावरी खोऱ्यातील वळण बंधाऱ्यातून उपलब्ध होणारे पाण्यातून आ. दाते यांनी प्रस्तावित केलेले वासुंदे तांबडीकार, मोरवाडी, निमदरी व वारणवाडी या कामांना देखील चालना द्यावी, अशा सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. मतदारसंघातील या कामांसाठी जलसंपदा मंत्री विखे पाटील, सचिव दीपक कपूर व संबंधित अधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देऊन प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय बैठकीत घेतला म्हणून आ. दाते यांनी मतदारसंघातील जनतेच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार व्यक्त केले.

## कोल्हारमध्ये दोन वाहनांचा भीषण अपघात

धडक इतकी प्रचंड होती की, कर्नाटकहून येणारे वाहन रस्त्यावर अक्षरशः उलटले होते. तर कारमधील प्रवासी हे गुनाहून (मध्य प्रदेश) अहिल्यानगरला  नातेवाईकाच्या लग्नासाठी चालले होते. या अपघातात १४ प्रवासी जखमी झाले. जखमींमध्ये महिला आणि छोट्या बालकांचा समावेश आहे. त्यांना किरकोळ स्वरूपाच्या दुखापती झाल्या. आजूबाजूच्या रहिवाशांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन ११ जखमींना उपचारासाठी तत्काळ प्रवरा ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. ३ जखमींना उपचारार्थ अहिल्यानगरला हलवले. स्थानिक नागरिकांनी रस्त्यावर उलटलेले वाहन दोराच्या साह्याने लोटून पूर्ववत केले.

रस्त्याच्या मधोमध असलेली दोन्ही अपघातग्रस्त वाहने रस्त्याच्या कडेला केली. त्यामुळे खोळंबलेली वाहतूक सुरळीत होण्यास मोठी मदत झाली. अपघातामुळे बराच काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. त्यामुळे महामार्गाच्या दुतर्फा वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. अत्यंत धीम्या गतीने दुतर्फा वाहतूक सुरू होती. घटनेच्या ५ तासानंतर सकाळी ११ वाजता वाहतूक पूर्णतः सुरळीत झाली. या यामध्ये दोन्ही वाहनांच्या अग्रभागाचा चक्काचूर झाला असून अपघातग्रस्त वाहने राहुरी पोलीस ठाण्यात नेण्यात आली.

## 'एक व्यक्ती दोन झाडे' उपक्रम कौतुकास्पद

पक्ष नेते संपत बारस्कर, पत्रकार सुधीर लंके, माजी नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, शिवाजी चव्हाण, उपायुक्त डॉ. संतोष टेंगळे, सहायक आयुक्त अशोक साबळे, शशिकांत नजन, सुरेश खामकर, तुलसीदास पालीवाल,  आण्णासाहेब पटारे, संदीप डेरे, मनोरंजन गटकळ, दीपक मेहता, आशिष वेळापुरे, संतोष गाढे, महेश दरंदले, विशाल बांगर, भाऊलाल सुनोरे, डॉ. कौस्तुभ हंगे, कुणाल तोडमल, कैलाश दिघे आदी उपस्थित होते. कॉलनीतील प्रत्येक कुटुंबातील सर्व लहान मोठे सदस्य दोन वृक्षांचे पालकत्व घेणार आहेत. त्या वृक्षाला त्यांचे नाव देण्यात येईल व त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी त्यांची राहिल. सर्व देशी वाणाची १० फूट उंचीची महोगनी, नीलमोहर, गुलमोहर, सीमारुबा, गोल्डन शॉवर, कांचन आदी २०० वृक्ष लावण्यात आले. हा सर्व उपक्रम संपत बारस्कर यांच्या सहकार्याने पार पडला, असे मत ॲड. कैलाश दिघे यांनी दिले.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/  PRGI No. MHMAR/25/RAA11.
This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut  No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk,  Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028  PRGI No.- MHMAR/25/RAA11

## पंचवीस गोवंश वासरांची सुटका



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** कत्तलीच्या उद्देशाने नेण्यात येणाऱ्या २५ गोवंशीय वासरांची सुटका काल पोलिसांनी केली. एका वाहनातून ही जनावरे नेण्यात येत होती.

सविस्तर वृत्त असे की, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे साहेब यांच्या सूचना व आदेशानुसार श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख हे अवैध धंद्याची माहिती घेत असताना त्यांना गुप्त बातमीदार मार्फत बातमी मिळाली की, नेवासा फाटा-श्रीरामपूर रोडवरील बोर्ड क्र. २ येथे एका गोवंशांची वाहतूक करणारा टेम्पो येणार असल्याची गुप्त माहिती मिळताच पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी पोलीस उपनिरीक्षक समाधान सोळंके यांच्यासह पोलीस पथक घटनास्थळाकडे रवाना केली होते. त्यानुसार श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन येथे अंमलदार अशोक पाटोळे यांनी दाखल केलेल्या फिर्यादीनुसार, नेवासा फाटा-श्रीरामपूर रोडवरील बोर्ड क्र. २ येथे एका गोवंशांची वाहतूक करणाऱ्या टेम्पोवर कारवाई करण्यात आली.

सदर टेम्पो क्रमांक एम. एच. २० सी. बी. १६९६ या वाहनात चालकाने अवैधरित्या २५ गोवंश जनावरे (बैल व गाय) वाहतूक करत असल्याचे माहिती दिली पोलिस तपासात आढळले.

# शेतीपूरक व्यवसायातून प्रगतीच्या मोठ्या संधी

## विवेक कोल्हे; संजीवनी फार्मर्स फोरमचा शेतकरी मेळावा उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** शेतकऱ्यांनी पारंपरिक शेतीसोबत पुरक व्यवसायाकडे वळावे. शेतीपूरक उपक्रम सुरू करून उत्पन्नाचे नवे स्रोत तयार करता येतात. अशा उपक्रमांमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण होईल, असे मत सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष विवेक कोल्हे यांनी व्यक्त केले.

कोपरगाव बेट येथील राष्ट्रसंत जनार्दन स्वामी भक्तनिवास क्रमांक दोन येथे संजीवनी उद्योग समूह आणि संजीवनी फार्मर्स फोरम यांच्या सहकार्याने आयोजित शेतीपूरक व्यवसायातील संधी शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार स्नेहलता कोल्हे होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. प्रतिमा पूजन आ. स्नेहलता कोल्हे, युवानेते विवेक कोल्हे आणि मत्स्य संस्थेचे उपाध्यक्ष अंबादास पाटोळे आणि शंकरराव



कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष राजेंद्र कोळपे आणि कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती साहेबराव रोहोम यांच्या हस्ते करण्यात आले.

विवेक कोल्हे यांनी सांगितले की, संजीवनी फार्मर्स फोरममार्फत शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसायाचे मार्गदर्शन, प्रशिक्षण, विपणन आणि सुविधा एकाच छताखाली उपलब्ध करून दिल्या जात आहेत यावर माहिती दिली. मत्स्य शेती, केशर, मशरूम, कोरफड, रेशीम, बांबू यासारखे पर्याय शेतकऱ्यांना उपलब्ध आहेत.

बँक ऑफ इंडियाचे प्रतिनिधी नितीन ढसाळ, संदीप खेमनर आणि अविनाश जाधव यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. प्रारंभी संजीवनी ग्रुप हेड न्यू व्हेंचर्स संजीव पवार यांनी प्रास्ताविक केले. मेळाव्याच्या शेवटी कोपरगाव औद्योगिक वसाहतीचे उपाध्यक्ष केशवराव भवर व इतर शेतकऱ्यांनी शेतीपूरक उद्योगांबाबत प्रश्न उपस्थित केले. त्याचे अभ्यासपूर्ण उत्तर विवेक कोल्हे यांनी दिले. आभार बाजार समितीचे सभापती साहेबराव रोहम यांनी मानले.

> माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "स्व. शंकरराव कोल्हे यांनी भविष्यातील धोके ओळखून, शेतकऱ्यांना शेतीसाठी जोडधंद्याची संकल्पना दिली. महिलांसाठी बचतगटांच्या माध्यमातून आर्थिक शिस्तीचा पाया घातला आणि त्यांना स्वयंपूर्ण बनवण्यासाठी विविध दिशा दाखवल्या. आज महिलांनी बचतगटांबरोबरच शेतीपूरक व्यवसायातही योगदान द्यावे त्या उत्तम पध्दतीने आर्थिक प्रगती साध्य करू शकतात."

# प्रवरानगर फाट्यावर दोन तरुणांना मारहाण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** राहाता तालुक्यातील प्रवरानगर फाटा येथे दोन तरुणांना मारहाण करण्यात आली. चालू गाडीतून पाणी अंगावर उडाल्याने वाद होऊन यात कुणाल कोळपकर, अमोल वाळके, या कोल्हार भगवतीपूर येथील दोन तरुणांना काल सकाळी १० वाजता लोखंडी रॉडने मारहाण करण्यात आली. यात दोघेही गंभीरित्या जखमी झाले आहे. त्यांना लोणी येथील प्रवरा हॉस्पिटलमध्ये दाखल केले आहे.



याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अक्षय कैलास चोरगे (वय २८, रा. पर्वती दर्शन, चाळ नंबर ११०/४, स्वारगेट पुणे) हे सॉफ्टवेअर कंपनीत कामाला असून ते सध्या कुणाल ज्ञानेश्वर कोळपकर यांच्या सॉफ्टवेअरच्या कामासाठी लोणी येथे खाजगी रूम घेऊन राहत आहे. अक्षय चोरगे हे कुणाल ज्ञानेश्वर कोळपकर यांच्या सॉफ्टवेअरच्या कामासाठी अमोल वाळकेसह आपल्या गाडीतून लोणीहून कोल्हारच्या दिशेने जात असताना, त्यांच्यापुढे असलेल्या गाडी (क्रमांक एम. एच. १२ अ ०७६४) मधील मुस्ताकीन सय्यद याने त्याच्या हातातील पाण्याची बाटली काढून बाटलीतील पाणी त्यांच्या अंगावर फेकले.

चोरगे व कोळपकर गाडीतूनच त्याला समजावून सांगत असताना त्याने त्यांना शिव्या देण्यास सुरुवात केली. तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. मुस्ताकीन व मुजाहिद यांनी हातातील रॉडने कुणाल कोळपकर व अमोल वाळके यांना मारहाण करून त्यांना गंभीरित्या जखमी केले. दोघांच्या गळ्यातील सोन्याची चेन काढून घेतली. फिर्यादी अक्षय चोरगे त्यांचे भांडण सोडवण्यासाठी गेले असता, त्यांनाही धक्काबुक्की करून जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी मुजाहिद सय्यद, मुस्ताकीन सय्यद यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल केला असून अधिक तपास लोणी पोलीस करीत आहेत.

## एकास रॉडने जबर मारहाण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** शेजाऱ्याचा मुलगा आपल्या घरासमोर खेळतो म्हणून मुलाच्या वडीलांना रॉडने मारून जखमी करण्याचा प्रकार श्रीरामपूर शहरातील वॉर्ड नं. २ मध्ये घडला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, किरण रघुनाथ गायकवाड असे जखमीचे नाव असून दोन दिवसांपूर्वी गायकवाड हे घरासमोर चकरा मारत असताना घराशेजारील इम्रान शाह आला. तुझ्या मुलाला समजून सांग, नेहमी आमच्या घरासमोर खेळतो असे म्हणाला. तेव्हा त्याला समजून सांगत असताना इम्रान शाह याने शिवीगाळ करत घरातून लोखंडी रॉड आणून आपल्या गाडीची खोपडी फोडत, नंतर आपल्या डोक्यात रॉड मारून जखमी केल्याचे फिर्यादीत गायकवाड यांनी म्हटले असून इम्रान शाह याच्याविरूद्ध शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# 'पुष्पा २' ची अभिनेत्री साईचरणी लिन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी :** दक्षिणेतील प्रसिद्ध अभिनेत्री आणि 'पुष्पा २' चित्रपटातील किसिक या गाण्यामुळे चर्चेत आलेली श्रीलीला हिने आज आपल्या आई स्वर्णलता यांच्याबरोबर शिर्डीत येऊन साईबाबांच्या समाधीचे मनोभावे दर्शन घेतलं आहे. येत्या दिवाळीत प्रदर्शित होणाऱ्या आपल्या आगामी 'आशिकी ३' या चित्रपटाच्या यशासाठीही तिनं साईबाबांच्या चरणी प्रार्थना केली आहे.



अभिनेत्री श्रीलीला आणि तिची आई स्वर्णलता यांनी काल शिर्डीत येऊन साईबाबांच्या समाधीचे मनोभावे दर्शन घेतल्यानंतर त्या खूप खुश झाल्या. त्याच बरोबर साईबाबांची सायंकाळी होणाऱ्या धुपारती आणि पहाटेच्या काकड आरती उपस्थिती त्यांनी लगावली आहे. साई दर्शनानंतर संस्थानच्या वतीनं अभिनेत्री श्रीलीला हिचा शाल आणि साईमूर्ती देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी साईबाबांच्या द्वारकामाई आणि गुरुस्थान मंदिरातही जाऊन श्रीलीला हिनं मनोभावे दर्शन घेतलं आहे.श्रीलीलानं व्यक्त केल्या भावना : साईदर्शनानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना श्रीलीला म्हणाली, आज साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेऊन खूप समाधान वाटलं. साईबाबाची धुपारती आणि काकड आरतीला प्रत्यक्ष उपस्थित राहण्याचा योग आल्यानं स्वतःला खूप भाग्यवान समजते. मी लहानपणापासून आईबरोबर शिर्डीला साईबाबांच्या दर्शनासाठी येत आहे. मात्र आज सहा वर्षांनंतर साईबाबांच्या दर्शनासाठी येण्याचा योग आला आहे. तसेच माझा आगामी येणाऱ्या आशिकी ३ हा चित्रपट येत्या दिवाळीत प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाच्या यशासाठीही आज साईबाबांच्या चरणी प्रार्थना केली आहे.

## प्रवरेच्या कृषीदूतांचे मनोली येथे स्वागत



**जनता आवाज वृत्तसेवा**


**लोणी :** संगमनेर तालुक्यातील मनोली येथे कृषी महाविद्यालय, लोणी येथील कृषीदुतांचे आगमन झाले आहे. यावेळी गावातील ग्रामस्थांनी आणि शेतकऱ्यांनी या कृषीदूतांचे स्वागत केले.लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा कषी शास्त्र संस्थेअंतर्गत असणाऱ्या कृषी महाविद्यालय, लोणी येथे हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, कृषी संचालक डॉ. उत्तमराव कदम, कृषी महाविद्यालय, लोणीचे प्राचार्य डॉ. दिलीप महाले यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम समन्वयक डॉ. रमेश जाधव, कार्यक्रम अधिकारी डॉ. विक्रम अनाप आणि प्रा. अक्षया वाळुंज यांच्या सूचनेनुसार आकाश ठाकरे, हर्षवर्धन सोनवणे, तनिष्क लिटे, अजिंक्य तासकर, शंतनू गाढे हे मनोली येथील शेतकर्यांचे अनुभव जाणून घेत त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. याप्रसंगी ग्रामपंचायत मनोली सरपंच अशोक पराड, उपसरपंच रूपम गाडेकर, ग्रामविकास अधिकारी श्रीमती सोनवणे, ग्रामस्थ व शेतकरी यांनी स्वागत केले. कृषी शिक्षणाच्या माध्यमातून हे कृषीदूत येथील शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती, बीजप्रक्रिया, गांडूळखत उत्पादन, चारा पिके, दुग्ध व्यवसाय, बायोगॅस आदीसंदर्भात माहिती देणार आहेत.

# पावसांच्या उघडपीमुळे पेरणीच्या कामांना वेग

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** गेल्या सहा-सात दिवसांपासून पावसाने दिलेल्या उघडपीमुळे शेतीच्या कामांना वेग आला असून शेतीच्या पुर्व मशागतीचे कामे उरकून खरीप हंगामातील पेरणीच्या कामांना वेग घेतला आहे. तालुक्यात यंदा मका, तुर, कापुस, उडीद पिकांकडे शेतकऱ्यांचा कल दिसत आहे.

अवकाळी पावसाने मागील दहा दिवसांपूर्वी श्रीगोंदा तालुक्यात जोरदार अतिवृष्टी झाली. तब्बल आठ दिवस अवकाळी पावसाने मोठे थैमान घातले. पावसाच्या विश्रांतीनंतर गेल्या दोन दिवसांपासून अचानक वातावरणात मोठा बदल होऊन ढगाळ वातावरण तयार होऊन पावसाच्या तुरळक सरी बरसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. २५ मे रोजी रोहिणी नक्षत्र सुरू झाले आहे. आता सात जून रोजी मृग नक्षत्रास प्रारंभ होत आहे रोहिणी नक्षत्रात अवकाळीने धुमाकूळ घातल्यामुळे फळबागा, कांदा, भुईमुग पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.



खरीप हंगामाच्या पेरणीसाठी जमिनीच्या मशागती पूर्व तयारी करून ठेवलेली असतानाच वातावरण पुन्हा ढगाळमय बनले गेले आहे. त्यामध्ये जोराचा अवकाळी बरसल्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या जमिनीचा वापसा झाला नाही.त्यामुळे शेतकरी जमिनीचा वापसा होण्याची वाट पाहत असतानाच पुन्हा पावसाचे वातावरण तयार झाल्याचे दिसून येत आहे.दरम्यान शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार चालू वर्षी पाऊस लवकर सुरू झाल्याने शेतकऱ्यांच्या खरीप हंगामाविषयी आशा पल्लवीत झाल्या आहेत. श्रीगोंदा तालुक्यात विशेषतः कुकडी लाभक्षेत्रात शेतकरी खरिपाची पिके मोठ्या प्रमाणावर घेतात.ही पिके कुकडी आवर्तनाच्या भरवशावर न राहता शेतकरी हे पावसाच्या धर्तीवर उत्पन्न घेतात. त्यातून शेतकऱ्यांना थोडी आर्थिक उन्नती मिळते. त्यामुळे खरीप हंगाम हा शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा समजला जातो.

## हार-फूल-प्रसादावरील बंदी कधी हटणार?

**जनता आवाज वृत्तसेवा**



**शिर्डी :** भारत-पाकिस्तान तणाव आणि साई संस्थानला आलेल्या ई-मेलद्वारे आलेल्या धमकीच्या पार्श्वभूमीवर १० मे रोजी साई मंदिरात हार, फुलं आणि प्रसाद नेण्यास बंदी लागू करण्यात आली होती. जवळपास महिनाभरापासून असलेली तात्पुरती बंदी अद्यापही कायम आहे. यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेवर नकारात्मक परिणाम होत आहे. तसेच अनेक भाविकांना दर्शनाच्या वेळी हार, फूल, प्रसाद अर्पण केल्याशिवाय दर्शनाच्या परिपूर्तीचे समाधान मिळत नाही.

साईसंस्थानला आलेला धमकीचा ई-मेल बनावट (फेक) होता हे साईसंस्थानने यापूर्वीच स्पष्ट केले आहे. तसेच 'ऑपरेशन सिंदूर' नंतर भारत-पाकिस्तान दरम्यानचा तणावही निवळला आहे. असे असतानाही, केवळ तात्पुरत्या स्वरूपात लागू केलेली ही बंदी आजही कायम असल्याने, ही बंदी नेमकी कधी उठणार ? हाच प्रश्न आता शेतकरी आणि व्यावसायिकांना सतावत आहे. यापूर्वी, कोविड महामारीच्या काळात संसर्ग टाळण्यासाठी आणि मंदिर बंद असल्याने हार-फुलं नेण्यास बंदी घालण्यात आली होती. ती बंदी जवळपास चार वर्षे टिकली, ज्यामुळे फूल उत्पादक आणि विक्रेत्यांचे मोठे नुकसान झाले. त्यावेळी प्रशासकीय स्तरावरील निर्णयानंतर परवानगीची वाट पाहावी लागली होती.

> न्यायालयाच्या बंदीमुळे फुलांच्या शेतीत गुंतवलेला पैसा वाया जात आहे, फुलांना बाजारपेठ मिळत नाही, रोजगारावर परिणाम होतो. अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून फुलांची लागवड केली.
>
> **-रवींद्र गोंदकर, भाजपा शहराध्यक्ष.**

# राजसत्ता, धर्मसत्ता एकत्र आली तर खरी क्रांती

## शिवगिरी महाराज; शिवपुराण कथेची भक्तिमय वातावरणात सांगता

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** धर्माच्या कार्यासाठी आणि प्रचार व प्रसार करण्यासाठी राजसत्ता आणि धर्मसत्ता एकत्र आलीतर खरी क्रांती घडते. अशीच क्रांती आयोध्येतील राम मंदिर बांधून रामराज्य आले असल्याचे गौरवोद्गार त्रंबकेश्वर येथील पंचदशनाम जुना आखाड्याचे महामंडलेश्वर १००८ स्वामी शिवगिरी महाराज यांनी काढले

संगमनेर तालुक्यातील धांदरफळ बुद्रुक येथील रामेश्वर मंदिराच्या प्रांगणात हरी ओम वृक्षमित्र परिवाराच्यावतीने गेली सात दिवसांपासून सुरू असलेल्या शिवपुराण कथेची भक्तिमय वातावरणामध्ये सांगता झाली. त्यावेळी भाविक भक्तांना उपदेश करताना १००८ शिवगिरी महाराज बोलत होते. यावेळी कोपरगाव येथील जनार्धन स्वामी आश्रमाचे मठाधिपती रमेशगिरी महाराज, नारायणपूर येथील अण्णा महाराज यांचे उत्तर अधिकारी टेंबे स्वामी महाराज, आमदार अमोल खताळ,



खासदार भाऊसाहेब वाकचौरे, माजीमंत्री बाळासाहेब थोरात, हरीओम वृक्षमित्र परिवाराचे प्रमुख अविनाश वाकचौरे यांच्यासह इतर सर्वच राजकीय पक्षाचे नेतेगण उपस्थित होते.

शिवगिरी महाराज म्हणाले की, हिंदू धर्मियांनी आपल्या धर्माचा प्रचार प्रसार करण्यासाठी पुढाकार घेत हिंदू धर्माची मशाल प्रत्येकाने आपल्या अंतकरणात पेटवून ठेवली पाहिजे. धर्मकार्यामध्ये प्रत्येकाने या शिवपुराण महाकथेचे श्रवण करून आचरणात आणणे गरजेचे आहे. हे धार्मिक कार्याचे व्यासपीठ आहे आणि त्याचे पावित्र्य प्रत्येकाने राखले पाहिजे. तुम्हा सर्वांवर भगवंताची कृपा अखंड अशीच राहावी आणि यांच्या हातून तुमच्या हातून या हिंदू धर्माचे कार्य असेच होत राहो साधूसंतांचे आपल्यावर खूप मोठे संस्कार केले आहे. ते संस्कार प्रत्येकाने जोपासणे गरजेचे असल्याचे सांगितले.

> महाराष्ट्र ही साधू संतांची भूमी आहे, या साधू संतांनी कायमच धर्माविषयी प्रचार प्रसार केला आहे. मला माझ्या हिंदूधर्माचा अभिमान आहे, या गावामध्ये धर्मासाठी एवढा मोठा कार्यक्रम झाला आहे . या धार्मिक कार्यक्रमातून खऱ्या अर्थाने प्रत्येकाला सकारात्मक ऊर्जा मिळाली आहे. धर्माचे काम असेल त्या ठिकाणी मी कधीच कमी पडणार नाही आणि हिंदू धर्मासाठी मी तुमच्या मागे कायमस्वरूपी भक्कम उभा राहील. या रामेश्वर परिसराच्या विकासासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा. यांच्या माध्यमातून भरीव निधी दिला आहे आणि येथून पुढील काळातही निधी दिला जाईल.
>
> **-आमदार अमोल खताळ, सदस्य संगमनेर विधानसभा.**

## ..तर शेतकरी कर्जमुक्त राहील-प्रसादराव तनपुरे

**जनता आवाज वृत्तसेवा**



**राहुरी :** राष्ट्रिय संत बद्रीनाथ महाराज तनपुरे यांनी लग्नात प्री-वेडिंग नको, डीजे नको, अवास्तव खर्च नको, साधेपणाने लग्न करा, हे आवाहन केले आता सर्व बहुजन समाजाने हे आवाहन मान्य केले पाहिजे. त्यानुसार आचरण केल्यास अनेक शेतकरी आणि इतर कुटुंबे कर्जापासून मुक्त राहतील, अशी आशा माजी खा. प्रसादराव तनपुरे यांनी व्यक्त केली.

दिवसेंदिवस लग्नातील डाम-दौल वाढत आहे. नवीन पिढीला आज डीजे लावून हळदी करणे, प्री-वेडिंगसाठी मोठा खर्च करणे आणि त्याचे प्रदर्शन स्क्रीनवर करणे याबद्दल विचार करणे आवश्यक आहे, तसेच, लग्नात हजारोंची जेवणावळी, मोठमोठे सेट आणि इतर खर्च यामुळे आपण तरुण पिढीला कुठे नेत आहोत, याचे भान आता सर्व समाजातील मंडळांनी केले पाहिजे. या सर्व पाश्चिमात्य प्रथा अनुकरणीय नाहीत तर आपल्या भारतीय संस्कृतीप्रमाणे लग्न समारंभकमी खर्चात पारंपरिक वाद्यात पार पाडले पाहिजेत. ही आता खरे तर सर्व समाजाची गरज आहे. लग्नातील अवास्तव खर्चानी अनेक कुटुंबे कर्जाच्या विळख्यात गेली आहेत. डामडौल करताना आपण नेमक्या पुढच्या पिढीला कुठे नेत आहोत, याचाही विचार आता समाजातील सर्व धुरीणांनी केला पाहिजे, असेही आवाहन तनपुरे यांनी केले.

# थोरातांमुळे निळवंडेचे पाणी शेतकऱ्यांच्या शेतात

## इंद्रजीत थोरात; शेतात पाणी खळाळल्याने चिंचोली गुरवचे नागरिक आनंदी



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** अहमदनगर जिल्ह्यातील १८२ गावांना व तळेगाव गटातील दुष्काळी गावांना निळवंडे चे पाणी मिळावे याकरता माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी धरण व उजवा आणि डावा कालवा पूर्ण केला. त्यांच्या प्रयत्नातून झालेल्या या कालव्यांमधून शेतकऱ्यांच्या शेतात पाणी आल्याने एक प्रकारे कार्यसिद्धी झाली असून उर्वरित शेतकऱ्यांना पाणी देण्यासाठी सुद्धा माजी मंत्री बाळासाहेब थोरात पाठपुरावा करत असल्याचे प्रतिपादन इंद्रजीत थोरात यांनी केले आहे.

चिंचोली गुरव येथे निळवंडे धरणाच्या डाव्या कालव्यातून विविध बंधारे भरून घेण्यात आले. यावेळी पाण्याचे पूजन प्रसंगी ते बोलत होते.

याप्रसंगी संपतराव गोडगे, हौशीराम सोनवणे, अविनाश सोनवणे, सरपंच विलास सोनवणे, बाबा ओहोळ, प्रभाकर कांदळकर, नामदेव दिघे, अनिल कांदळकर, राजू गोडगे, विजय गोडगे, सतीश सोनवणे, डॉ. सुहास आभाळे, विनोद गोडगे, विलास मास्तर, सचिन दिघे, योगेश सोनवणे, संदेश गोडगे, अशोक गोडगे, के. डी. सोनवणे, अरुण आभाळे, सोमनाथ आभाळे, भास्कर पानसरे आदींसह मान्यवर उपस्थित होते.

इंद्रजीत थोरात म्हणाले की, निळवंडेच्या डाव्या आणि उजव्या कालव्यातून पाणी आल्याने संगमनेर तालुक्यात जलसमृद्धी निर्माण झाली आहे. थोरात कारखान्याच्या माध्यमातून विविध गावांमध्ये यंत्रणा देऊन चारी खोदून बंधारे भरून देण्यात आले आहे. तर अनेक ठिकाणी पाईप देऊन पाणी उचलले गेले आहे.

तर संपतराव गोडगे म्हणाले की, चिंचोली गुरव मध्ये निळवंडे धरणाचे पाणी आल्याने शेतकरी व नागरिक आनंदी झाला आहे. कारखान्याने खूप मोठी मदत केली जेसीपी पोकलॅण्डसह कर्मचारी रात्रंदिवस काम करत होते आणि त्या माध्यमातून अगदी मसोबाच्या बंधाऱ्यांमध्ये पाणी टाकण्यात आले आहे. सरपंच सोनवणे म्हणाले की, अशक्य वाटणारे काम माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी शक्य करून दाखवले आहे. काम करणाऱ्या व्यक्तीच्या पाठीशी कायम सातत्याने लोकांनी उभे राहिले पाहिजे तर अविनाश सोनवणे म्हणाले की या भागामध्ये येऊन काही लोक भूलथापा व्हाट्सअप वर खोटी माहिती पसरवतात त्यांना वेळीच रोखा असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक हौशीराम सोनवणे यांनी केले. तर सूत्रसंचालन विलास मास्तर सोनवणे यांनी केले.

### म्हसोबा बंधाऱ्यात पाणी नेण्यासाठी गोडगेंचा पाठपुरावा

थोरात कारखान्याच्या यंत्रणेच्या माध्यमातून चिंचोली गुरवमध्ये चारीद्वारे पाणी नेण्यात आले हे पाणी म्हसोबा बांधाऱ्यात पाईपलाईनद्वारे नेण्याकरता महेंद्र गोडगे यांनी सातत्याने मोठा पाठपुरावा केला. हे पाणी मसोबा बांधण्यात आल्याने अशक्य वाटणारे काम झाल्याने नागरिक महिला युवक मोठे आनंदी झाले असून या सर्वांनी पाण्याचे अभुतपूर्व स्वागत केले आहे.

# ...नाहीतर गुन्हे दाखल करून अटक करू!

## वन कर्मचाऱ्यांविरोधात आदिवासी बांधवांचे निदर्शन करुन आंदोलन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी खुर्द :** राहुरी तालुक्यातील चिखलठाण ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या कुरणदरा येथे आदिवासी कुटुंबांना प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुल मंजूर झाले आहेत. स्वतः च्या ७/१२ व वन हक्क पत्र असलेल्या जमिनीवर घरकुल बांधकाम करत असतांना सतत अडथळा निर्माण करून वनपाल गिरी व वनरक्षक संतोष साळवे हे स्वतः आणि त्यांचे स्थानिक कर्मचारी यांच्याकडून त्रास दिला जात आहे. गुन्हे दाखल करू, अटक करू, अशा धमक्या देऊन दहशत निर्माण करत आहे.

या प्रकरणी त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी. या मागणीसाठी काल वन परिक्षेत्र कार्यालय राहुरी अंतर्गत असलेल्या वन परिमंडळ कार्यालय म्हैसगाव येथे निदर्शन करुन आंदोलन करण्यात आले.

आंदोलनाच्या ठिकाणी वनपरिक्षेत्र अधिकारी युवराज पाचरणे हे त्यांच्या विभागाने चालवलेल्या अडवणूक प्रकरणी कोणतीच ठोस माहिती देऊ शकले नाही. किती कुटुंबांचे घरकुल बांधकामाला विरोध असल्याची यादी ते देऊ शकले नाही. ७/१२ असलेल्या जागेवर अडवणूक का करता तर वर्ग २ ची जमीन असल्याचे सांगण्यात आले. वन हक्क पत्र असलेल्या जागेवर अडवणूक का करता तर तेथे बांधकामासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाची परवानगी पाहिजे, असे सांगिले.




परंतु, तशी कोणतीच सूचना किंवा पत्र या अगोदर घरकुल लाभार्थ्यांना देण्यात आले नाही. वन विभाग कर्मचाऱ्यांनी महिलांना शेण खा तुमच्यावर गुन्हे दाखल करू, अटक करू, पिंजऱ्याची गाडी आणू अशा धमक्या देऊन दिल्या. या बद्दल विचारणा केली असता कोणतेच उत्तर दिले नाही. या संदर्भात आता पर्यंत ३ निवेदने आणि एक पत्र दिले आहे.

दिलेल्या निवेदनावर काय कार्यवाही करण्यात आली. तर त्याचे ही उत्तर परिक्षेत्र अधिकारी पाचरणे यांना देता आले नाही. प्रसंगी गंगाराम वाघ यांनी बांधकाम सुरू केलेली जागा आणि त्यांचा ७/१२ असलेली जागा वेग वेगळी असल्याचा निराधार मुद्दा उपस्थित केला. आणि गंगाराम वाघ यांनी त्यांची जमीन मोजून घ्यावी, असे सांगितले. तर पाचरणे यांनी तुम्ही घरकुल बांधले तर तुमच्यावर गुन्हे दाखल करू, असे सांगून चर्चेतून पळ काढला.

निराधार उत्तरे देणारे, कोणताही अभ्यास आणि कार्यवाही न करता काम करणारे वन कर्मचाऱ्यांच्या दादागिरीच्या भाषेवर संतप्त झालेल्या आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी केली. वन विभागाचा धिक्कार करत अन्यायाचा न्याय आणि हक्क ठणकावून सांगितला. न्याय आणि हक्कासाठी लढा चालू ठेवणार असल्याची घोषणा करून आंदोलन स्थगित केले.

# प्रा. धस यांचे आरएसपी अधिकारी प्रशिक्षण पूर्ण

## जिल्हा पोलिस अधीक्षक घार्गे यांच्या हस्ते धसांना प्रमाणपत्र प्रदान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वडाळा महादेव :** प्रा. सुनिल चंद्रशेखर धस यांनी नुकतेच महाराष्ट्र राज्य गृह विभाग, पोलिस व शालेय शिक्षण विभागाच्या अंतर्गत महाराष्ट्र राज्य वाहतूक सुरक्षा व नागरी संरक्षण अधिकारी हे दहा दिवसीय प्रशिक्षण पोलिस मुख्यालय, अहिल्यानगर येथे यशस्वीपणे पूर्ण केले.

प्रा. धस हे अहमदनगर जिल्हा मराठा संस्थेच्या ज्ञानोदय इंग्लिश स्कूल, नेवासा येथे इंग्रजीचे अध्यापक म्हणून कार्यरत आहेत. या प्रशिक्षणाअंतर्गत वाहतूक नियंत्रण, नागरी संरक्षण, मैदानी कवायत, अग्निशमन सेवा, प्रथमोपचार, योग, ध्यानधारणा व इतर आकस्मिक सेवा यांचे प्रशिक्षण देण्यात आले.




हे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर विशेष योगदानाबद्दल त्यांनां जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. या अभ्यासक्रमात इयत्ता पाचवी ते दहावी या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिस्त व अनुशासन याचे धडे विशेष तासिका अंतर्गत मिळणार आहेत. आपले जीवन सेवेसाठी हे ब्रीदवाक्य असणाऱ्या या संस्थेचे मुख्यालय नागपूर येथे स्थित आहे.

याप्रसंगी माध्यमिक शिक्षण अधिकारी अशोक कडूस, पोलिस निरीक्षक उमेश परदेशी, वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक बाबासाहेब बोरसे, संस्थेचे राज्यस्तरीय अध्यक्ष संजय शेंडे, उपाध्यक्ष पितांबर महाजन, विभागीय समादेशक सिकंदर शेख, जिल्हा समादेशक सोमनाथ बोंतले, उप जिल्हा समादेशक प्रकाश मिंड, कवायत प्रशिक्षक मुसा सय्यद व इतर यांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल विद्यालयाचे प्राचार्य रावसाहेब चौधरी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# ‘जय महेश’ घोषणांनी पाथर्डी दुमदुमली

## शहरात शोभायात्रा; शंकर-पार्वतीच्या वेशभूषेतील बालकलाकारांनी वेधले सर्वांचे लक्ष

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** माहेश्वरी समाजाच्या वतीने बुधवारी पाथर्डी शहरात महेश नवमी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा झाला. महेश नवमी, जी भगवान महेश यांच्या पूजेचा विशेष पर्व मानला जातो. माहेश्वरी समाजासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. ऐतिहासिकदृष्ट्या या दिवशी माहेश्वरी समाजाची उत्पत्ती भगवान शिव आणि माता पार्वती यांच्या आशीर्वादाने झाल्याचे मानले जाते. हा उत्सव भक्ती, एकता आणि समाजाच्या सांस्कृतिक वारशाचे प्रतीक मानला जातो.

सायंकाळी सात वाजता नवी पेठ येथून सुरू झालेल्या भव्य शोभायात्रेत भगवान महेशाची प्रतिमा आणि शंकर-पार्वतीच्या वेशभूषेतील बालकलाकारांनी सर्वांचे लक्ष वेधले. शोभायात्रेदरम्यान ‘जय महेश’च्या गगनभेदी घोषणांनी वातावरण भक्तिमय झाले.

बँड पथकासह नाईक चौक, अजंठा चौक, क्रांती चौक, गणेश पेठ मार्गे काढण्यात आलेली ही मिरवणूक श्री माहेश्वरी श्रीराम मंदिरात समारोपित झाली. शोभायात्रेत एकसमान पोशाख परिधान केलेल्या महिला-पुरुष मंडळी आणि शिस्तबद्ध बँड पथकामुळे उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले. फटाक्यांच्या आतिशबाजीने मिरवणुकीत रंगत आणली. मंदिरात अनिल डागा आणि सुनिता डागा यांच्या हस्ते महाआरती झाली, तसेच महाप्रसाद वितरणाने कार्यक्रमाची सांगता झाली.



### शोभायात्रेसाठी यांनी घेतले परिश्रम

पाथर्डी तालुका माहेश्वरी सभा, श्रीराम मंदिर देवस्थान ट्रस्ट, माहेश्वरी युवक व महिला मंडळ यांनी आयोजनात सहभाग घेतला. संदीप बाहेती, रामनाथ बंग, मुकुंद लोहिया, सोमनाथ पल्लोड, संतोष बाहेती आदी उपस्थित होते तर सचिन बजाज, गणेश बाहेती, पुरुषोत्तम हारकुट, गोविंद लाहोटी, जगदीश लोहिया, कमलेश बांगड, ओम डागा, महेश बाहेती यांनी शोभायात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

# श्री स्वामी समर्थ देवस्थानात भक्तांची मांदियाळी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** पारनेर तालुक्यातील रांधे येथील श्री स्वामी समर्थ देवस्थान येथे प्रत्येक गुरुवारी स्वामी भक्तांची मोठी मांदियाळी असते. त्यानिमित्ताने प्रत्येक गुरुवारी रांधे येथे भक्तांसाठी एक भक्तिमय सोहळाच ठरतो, असे प्रतिपादन श्री स्वामी समर्थ देवस्थानचे संस्थापक अध्यक्ष अनिलराव आवारी यांनी केले आहे.



प्रत्येक गुरुवारी सकाळपासूनच वातावरणात एक खास पवित्रता जाणवत असते. संध्याकाळी सूर्य मावळतीकडे झुकू लागतो आणि जसजसी महा आरतीची वेळ समीप येते, तसतसी स्वामींच्या मंदिराभोवती भक्तांचा ओघ वाढू लागतो. महाआरतीला सुरूवात झाली की, मंदिरात घंटांचा व शंखाचा ध्वनी आणि उंच स्वरात श्री स्वामी समर्थ महाराजांचा गजर घुमू लागतो.

स्वामींच्या तेजोमय व प्रसन्न मूर्तीला हजारो स्वामी भक्त डोळ्यांमध्ये साठवून ठेव नतमस्तक होतात. दीप आरतीचा तेजस्वी प्रकाश, उंचावलेल्या आरतीच्या थाळ्या, धूपाचा मंद दरवळ आणि मंत्रोच्चारांनी मंदिरातील वातावरण भक्तिभावाने भारून जाते. कणाकणात स्वामींचा स्पंदन अनुभवायला येत होते. जणू ही फक्त आरती नसते. महाआरती केवळ एक विधी नसतो, ती असते श्रद्धेची उत्कट अभिव्यक्ती.या महाआरतीनंतरचा महाप्रसाद हा सोहळ्याचा आणखी एक भक्तिपूर्ण टप्पा होतो. पानात वाढलेला भक्तीयुक्त महाप्रसाद हे सर्व प्रेमाने पण पोटभर वाटले जाते. मोठ्यांपासून लहानांपर्यंत प्रत्येकाच्या चेहऱ्यावर समाधान आणि प्रसन्नता झळकत असते.

> गुरुवारच्या दिवशी निर्माण झालेलं वातावरण म्हणजे स्वामींच्या कृपेचा झरा होता. भक्तांच्या प्रेमाने, निष्ठेने आणि सामूहिक एकतेने घडलेला हा दिवस केवळ एक प्रसंग नव्हे, तर कायम स्मरणात राहणारा आध्यात्मिक अनुभव असतो. **– अनिल आवारी**

# देवसडेमध्ये शेतकऱ्यांकडून कृषिदुतांचे स्वागत




**जनता आवाज वृत्तसेवा**

**कुकाणा :** महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्न मुळा एज्युकेशन सोसायटीच कृषि महाविद्यालय, सोनई महाविद्यालयाच्या अंतिम वर्षाचे विद्यार्थी ग्रामीण कृषी जागरुकता कार्यानुभव व कृषी औद्योगिक संलग्नक अंतर्गत देवसडे गावात दाखल झाले असून ग्राम पंचायतीच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.

यामध्ये कृषीदूत अनमोल गरड, वरद खरात, गौरव गांजे, अजय बहिरम, साहिल खोबरागडे, ओम देवगावकर यांचा समावेश असून ते शेतकऱ्यांना विविध विषयावर मार्गदर्शन आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती, तर गावामध्ये प्रत्यक्ष सर्वेक्षण करून शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी, त्यांचे ग्रामीण जीवनमान, सामाजिक व आर्थिक स्तर, नैसर्गिक साधन संपत्ती समाजातील सामाजिक स्थिती पीक पद्धती अशा विविध गोष्टीचा अभ्यास करणार आहेत.

त्याच बरोबर शेतकऱ्यांनाही विविध कार्यक्रम व प्रात्यक्षिक दाखविणार आहे. माती व पाणी परीक्षण, विविध पिकांची लागवड तंत्रज्ञान, पिकांवर येणारे रोग व किडी याची माहिती व व्यवस्थापन, जनावरांची काळजी व संगोपन तसेच शेतीशी निगडित विविध समस्यांचे निराकरण, बीज प्रक्रिया या विषयावर मार्गदर्शन प्राचार्य डॉ. हरी मोरे, उपप्राचार्य प्रा. सुनिल बोरुडे, कार्यक्रम समन्वयक डॉ. अतुल दरंदले, कार्यक्रम अधिकारी डॉ. एस. बी. चौगुले यांचेसह तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

### गावकऱ्यांनी केले कृषीदुतांचे स्वागत

कृषीदूतांचे सरपंच बाळुबाई काळे, उपसरपंच अनिता घोडेचोर, गंगाधर फटांगरे, नवनाथ घोडेचोर, बबनराव पिसोटे, राजेंद्र उगले, सोपानराव घोडेचोर, दत्तात्रय दळे, ग्रामविकास अधिकारी आदिनाथ जाधव , कृषिसेवक जगधाने, ग्रामपंचायत कर्मचारी बाळासाहेब पोळ यांच्यासह गावकऱ्यांनी स्वागत केले.

# पैलवानाला जात-धर्म नसतो, हनुमानजींचे अंश असते

## आदिनाथ महाराज शास्त्री; शेवगावला देवाभाऊ केसरी कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** शेवगाव येथे बुधवारी देवाभाऊ केसरी कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन तारकेश्वर गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री, ह.भ.प. राम महाराज झिंजुर्के व रेणुका मल्टीस्टेटचे चेअरमन प्रशांत भालेराव यांच्या हस्ते करण्यात आले. अहिल्यानगर जिल्हा तालीम संघ, शेवगाव तालुका तालीम संघ आणि वंदे मातरम क्रीडा व सांस्कृतिक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या कुस्ती स्पर्धेत नगर जिल्ह्यासह राज्यातील २५० पेक्षा अधिक कुस्तीपटू कुस्ती स्पर्धेत सहभागी झाले आहेत.

> पैलवान मुलांमध्ये व वस्तादात हनुमानजीचे रुप दिसते. आपल्या संस्कृतीतील कुस्ती खेळाला चालना देण्यासाठी घेण्यात आलेला उपक्रम कौतुकास्पद आहे. अरुण मुंढे हे स्वत: खेळाडू असल्याने त्यांनी खेळाडूंची खरी किंमत करून कुस्ती फड रंगवला. पैलवानला जात धर्म नसतो, हनुमानजींचे अंश त्यांच्यात असते. सातत्याने कुस्ती आखाडा घेण्यात यावा.
>
> **– आदिनाथ महाराज शास्त्री**

### काल झाल्या निमंत्रित कुस्त्या

पहिल्या दिवशी ४२, ४८, ५२, ५५, ६०, ६५, ७४, ८४ किलो आणि ८४ ते १२५ किलो ओपन गटातील कुस्त्यांना प्रारंभ झाले. गुरुवारी (दि.५ जून) निमंत्रित कुस्त्या झाल्या आहेत.

शेवगावच्या खंडोबा मैदानावर कुस्तीचा थरार रंगला असून, पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी पहिल्याच दिवशी कुस्ती पाहण्यासाठी मोठी गर्दी केली होती.

या उद्घाटन सोहळ्यासाठी ज्ञानेश्वर महाराज बटूळे, भाजपचे प्रदेश सरचिटणीस तथा या स्पर्धेचे आयोजक अरुण मुंढे,



जिल्हा तालीम संघाचे अध्यक्ष पै. वैभव लांडगे, खजिनदार पै. नाना डोंगरे, क्रीडा अधिकारी भाऊराव वीर, जगदीशशेठ धूत, विहीपचे वंजारी सर, नंदू मुंढे, प्रशांत भालेराव, तुषार वैद्य, अमोल सागडे, डॉ. कृष्णा देहाडराय, एकनाथ कुसळकर, अंकुश कुसळकर, प्रकाश चित्ते आदी मान्यवर उपस्थित होते.

अरुण मुंढे म्हणाले की, राजकारणात आल्यानंतर खेळाकडे दुर्लक्ष झाले, मात्र खेळाडूवृत्तीचा पिंड सोडला नाही. वंदे मातरम क्रीडा मंडळाच्या माध्यमातून युवकांना व्यायामाची आवड निर्माण होण्यासाठी व त्यांना दिशा देण्यासाठी व्यायामशाळा व कुस्ती संकुल उभारले. त्याचे उद्घाटन सोहळ्यासाठी मोठ्या प्रमाणात या कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

शेवगावमध्ये पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणात कुस्त्याचे नियोजन करण्यात आले असून, या स्पर्धेत एक पंजाब केसरी तर तीन महाराष्ट्र केसरी एकाच आखाड्यात उतरणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# झरेकाठी येथे कृषीदुतांकडून शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**झरेकाठी :** संगमनेर तालुक्यातील झरेकाठी येथे श्रमशक्ती कृषी महाविद्यालय मालदाड येथील कृषिदूतांचे आगमन झाले आहे. पुढील तीन महिन्यांसाठी ते गावात वास्तव्यास राहून शेतकऱ्यांना विविध कृषी विषयक मार्गदर्शन करणार आहेत. या कृषिदूतांचे झरेकाठी येथे ग्रामपंचायत व शेतकऱ्यांच्या वतीने स्वागत करण्यात आले.

या गटाचे मार्गदर्शक कॉलेजचे प्राचार्य डॉ. अरविंद हारदे असून या गटांमध्ये कृषिदूत गणेश लबडे, कृष्णा लाहोटी, सुशांत नवले, शिवाजी सोनवणे, पवण खतोडे, पृथ्वीराज रसाळ आणि स्वप्नील शिंदे हे विद्यार्थी आहेत. हे कृषिदूत शेतकऱ्यांना नव्या तंत्र माहिती, सुधारित शेती पद्धती, पिकाचे नियोजन, खत व्यवस्थापन, जैविक शेती, सिंचन पद्धती आणि विविध सरकारी योजनेचा लाभमिळवून देण्याचे कार्य करण्यात येणार आहे.

या कृषिदूतांचे झरेकाठी येथे ग्रामपंचायत व शेतकऱ्यांच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी गावचे सरपंच अशोक वाणी, कामगार पोलीस पाटील सुधाकर वाणी,पत्रकार सोमनाथ डोळे, ग्रामसेविका मनीषा शिंदे, कृषी सहाय्यक सचिन गायकवाड, कृषी सहाय्यक स्वप्निल पाटील, खुशाल भाऊ महाराज वाणी, वैशाली घोलप, अश्विनी वाणी, दत्तात्रय व्यवहारे, लक्ष्मण वाणी यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# नेवासा तालुक्यात रासायनिक खतांचा तुटवडा

## तातडीने खते उपलब्ध करा : दादासाहेब गंडाळ

जनता आावाज वृत्तसेवा

**नेवासा :** मे महिन्यात झालेल्या पावसामुळे वेळेवर मशागतीसाठी खतांची प्रचंड गरज आहे. मात्र, लिकिंग विरूद्ध सरकारने आक्रमक भूमिका घेतल्यामुळे खत कंपन्यांकडून युरिया देण्यास टाळाटाळ सुरू आहे. सध्या नेवासा तालुक्यात युरियासह इतर रासायनिक खतांचा तुटवडा निर्माण झाला आहे. तातडीने खते उपलब्ध करून देण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेवासा विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष दादासाहेब गंडाळ यांनी केली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये गेल्या दोन महिन्यांपासून युरिया खताचा प्रचंड तुटवडा भासत आहे. ऊस पिकाचे क्षेत्र वाढले असून मे महिन्यात झालेल्या



पावसामुळे वेळेवर मशागतीसाठी खतांची प्रचंड गरज आहे. मात्र, लिकिंग विरूद्ध सरकारने आक्रमक भूमिका घेतल्याम ुळे खत कंपन्यांकडून युरिया देण्यास टाळाटाळ सुरू आहे. सध्या नेवासा तालुक्यात युरियासह इतर रासायनिक खतांचा तुटवडा निर्माण झाला आहे.

काही तालुक्यास जवळपास मोठ्या प्रमाणात युरियाचा बफरसाठा आहे. मात्र, तो शेतकऱ्यांना उपलब्ध होत नाही व खत कंपन्यांकडून नवीन पुरवठा होत नाही. यापुढे उपलब्ध होणारा युरिया सुद्धा जाणार, अशी माहिती मिळाली. त्यामुळे खरिपात शेतकऱ्यांना युरिया मिळेल याची शाश्वती नाही. याप्रकरणी शासनाचेही दुर्लक्ष होत आहे.

डीएपी व युरिया सारख्या खतांना मोठ्या प्रमाणात केंद्र सरकारकडून अनुदान उपलब्ध होते. खत कंपन्यांकडून पुरवठा करण्यास असमर्थता का दर्शविली जाते, असाही प्रश्न निर्माण होत आहे. गेले एक वर्षापासून डीएपी खताची मागणी असूनही पुरवठा झालेला नाही. शासनाने शेतकऱ्यांना युरिया व डीएपी खतांचा पुरवठा करावा, अशी मागणी गंडाळ व सहकाऱ्यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

### इतर खतांची विक्री थांबली

शेतकऱ्यांसह व्यापारी खताचा रॅक लागण्याची वाट पाहत आहेत. युरिया उपलब्ध नसल्यामुळे व्यापाऱ्यांची इतर खते विक्री थांबली. याबाबत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी व फर्टिलायझर असोसिएशन यांच्याकडे सखोल चौकशीची मागणी केली आहे. लिकिंग (पुरवणी खते) बंद केल्यामुळे खत कंपन्यांकडून युरिया पुरवठा करण्यास असमर्थता दर्शविली जात आहे, असे निदर्शनास आले. हा विषय कृषी मंत्र्यांच्या अंतर्गत येतो, असे कृषी विभागाचे अधिकारी सांगत असल्याचे गंडाळ यांनी सांगितले.

# शहरातील रस्त्यांचे मनपाकडून विद्रुपीकरण

जनता आवाज वृत्तसेवा

**अहिल्यानगर :** शहरांमध्ये सध्या आमदार संग्राम जगताप यांच्या निधीतून शहरांमध्ये विकास होत आहे व हे रस्ते पूर्ण तत्वावर झाले की, मनपा प्रशासनाच्या पाणीपुरवठा विभाग हा रस्ता खोदून पाईपलाईनचे काम करते. मात्र या रस्त्याचे विद्रूपीकरण होऊन मोठ्या खड्ड्यात रूपांतर होते. यामध्ये कोणतीही दुर्घटना घडते. त्यामुळे रस्ता होण्यापूर्वी मनपा प्रशासनाने कामे पूर्ण करावी व जिथे रस्ता खोदण्यात येईल तेथे रस्ता बनवून देण्याची मागणी माजी नगरसेवक विजय गव्हाळे यांनी केली आहे.

गव्हाळे यांनी म्हटले आहे की, रेल्वे स्टेशन भेवरी चाळ, गवळीवाडा येथे माजी नगरसेवक विजय गव्हाळे यांनी आमदार संग्राम जगताप यांच्या निधीतून सहा म हिन्यापूर्वी संपूर्ण रस्ता काँक्रिटीकरण केला. तेव्हा महापालिकेच्या पाणीपुरवठा विभाग व इतर विभागाने जमिनीखालचे कामे केलेली होती. आता पूर्ण झालेल्या रस्ता अचानकपणे कुठलीही परवानगी न घेता रस्ता खोदण्यात आला. या अशा मनपा प्रशासनाच्या भोंगळ्या कारभारामुळे रस्त्याचे विद्रूपीकरण होत आहे. याला थांबवण्यासाठी प्रशासनाने कारवाई करण्यात यावी व रस्ते होण्यापूर्वीच कामे पूर्ण करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

### कारवाईची मागणी

नव्याने झालेले रस्ते नाल्यांच्या काम साठी खोदून ते तसेच ठेवलेल्या प्रकरणी महापालिकेच्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. शहरात अनेक ठिकाणी रस्ते खोदून महापालिका प्रशानाने ठेवलेले आहेत. हे रस्ते मातीने बुजविण्यात आलेले आहे. आता पावसाचे दिवस सुरु झाल्याने सिमेंटच्या रस्त्यावर चिखल होत आहे. याकडे संबंधित विभागाचे दुर्लक्ष झालेले आहे. त्यामुळे नागरिकांमधून नाराजी व्यक्त होत आहे.

# लिंबाच्या भावात घसरण

जनता आवाज वृत्तसेवा



**अहिल्यानगर :** मे महिन्यातच अवकाळी पावसाने हजेरी लावलेली आहे. त्याचा परिणाम लिंबाच्या बाजारावर झालेला आहे. जिल्ह्यात लोणी उपबाजार समितीत लिंबाला बुधवारी (ता. लिंबाला साडेतीन हजारांचा भाव मिळाला. त्या खालोखाल राहाता व दादापाटील शेळके कृषी उत्पन्न बाजार समितीत तीन हजार रुपायंचा भाव मिळाला.

लिंबाच्या भावात झालेल्या घसरणीमुळे लिंबू उत्पादक अडचणीत सापडलेले आहेत.दादापाटील शेळके कृषी उत्पन्न बाजार समितीत लिंबाचे लिलाव झाले. २३.१७ क्विंटल लिंबाची आवक झाली. लिंबाला कमीत कमी सहाशे व जास्तीत जास्त तीन हजारांचा प्रतिक्विंटलचा भाव मिळाला. सरासरी लिंबाला सरासरी १८०० रुपयांचा प्रतिक्विंटलचा भाव मिळाला. राहाता बाजार समितीत दोन क्विंटल लिंबाची आवक झाली. लिंबाला कमीत कमी दोन हजार व जास्तीत जास्त तीन हजार रुपये क्विंटलचा भाव मिळाला. लिंबाला सरासरी २५०० रुपये क्विंटलचा भाव मिळाला. लोणी उपबाजार समितीत लिंबाची दोन क्विंटल आवक झाली. लिंबाला कमीत कमी तीन हजार व जास्तीत जास्त साडेतीन हजार रुपयांचा भाव मिळाला. मे महिन्यात अवकाळी पावसाने जिल्ह्यात दमदार हजेरी लावलेली आहे. त्यामुळे लिंबाच्या भावात कम ालीची घसरण झालेली आहे. त्यामुळे लिंबू उत्पादक आर्थिक अडचणीत आलेले आहे. शासनाने लिंबू उत्पादकांना आर्थिक मदत करावी, अशी मागणी होत आहे.

### लिंबाच्या बागांचे नुकसान

अवकाळी पावसामुळे लिंबाच्या बागांचे मोठे नुकसान झालेले आहे. वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने फळ गळती झालेली आहे. त्याचाही परिणाम सध्या भावावर झालेला आहे.चौकटमागणी कमी झालीअवकाळी पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झालेला आहे. त्यामुळे लिंब सरबत, उसाचा रस आदीला मागणी कमी झालेली आहे. त्यामुळे लिंबालाही मागणी कमी झालेली आहे. त्यामुळे त्याचा परिणाम भावावर झालेला आहे. ४० रुपये किलो किरकोळ बाजारात एप्रिल महिन्यात १०० रुपयांपेक्षा जास्त किलोच्या दराने लिंबाची विक्री झाली. मात्र आता सध्या किरकोळ बाजारात लिंबाला अवघा ४० रुपये किलोचा भाव मिळत आहे. त्याचा लिंबू उत्पादकांना मोठा फटका बसला आहे.

# छत्रपती अभियांत्रिकीमधून १३४ विद्यार्थ्यांना नोकऱ्या

जनता आवाज वृत्तसेवा

**आहिल्यानगर :** दरवर्षीप्रम ाणे यावर्षी देखील छत्रपती अभियांत्रिकीमध्ये आयोजित प्लेसमेंटच्या विविध संधींचा लाभ घेत विद्यार्थ्यांनी नामांकित कंपनीम ध्ये आपली निवड निश्चित केली आहे.



सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे म ेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागासाठी १०० टक्के प्लेसमेंट झाली असून सिव्हिल इंजिनिअरिंग ७४ टक्के तर कम्प्युटर इंजिनिअरिंगसाठी ६२ टक्के आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशनच्या ६८ टक्के विद्यार्थ्यांची प्लेसमेंट विविध कंपनीमध्ये झाली आहे. यामध्ये नगर, सुपे, चाकण, रांजणगाव, नाशिक येथील नामांकित खाजगी कंपनी, काही शासकीय, निमशासकीय तसेच बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये विद्यार्थ्यांनी नोकरी मिळवत महाविद्यालयाचे नाव एका वेगळ्या स्तरावर घेऊन गेले आहेत.

प्रामुख्याने व्हीआरडीई, क्रॉम्प्टन ग्रीव्हज, एपिटोम कंपोनंट लिमिटेड, एक्साइड इंडस्ट्रीज, बॉशच्, क्लासिक व्हील्स या कंपन्यांचा देखील समावेश आहे. महाविद्यालयामध्ये कार्यरत असणाऱ्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग, सिव्हिल इंजीनियरिंग, कम्प्युटर इंजिनिअरिंग तसेच इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागांतर्गत शैक्षणिक वर्षात २०२४-२५ मध्ये सातत्याने घेण्यात आलेल्या आणि प्लेसमेंटसाठी उपयुक्त असणाऱ्या ऍक्टिव्हिटी, ट्रेनिंग प्रोग्राम, सेमिनार या सर्व गोष्टी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच कॅम्पस प्लेसमेंट साठी खूप उपयुक्त ठरल्या, असे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाय. आर. खर्डे सर यांनी व्यक्त करत विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# राष्ट्रवादी काँग्रेस पदाधिकारी बैठकीचे आयोजन

जनता आवाज वृत्तसेवा

**श्रीरामपूर :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित दादा) आपला वर्धापान दिन पुणे येथे साजरा करीत आहोत. श्रीरामपूर विधानसभा मतदार संघातील बहुसंख्य कार्यकर्ते सदरच्या कार्यक्रमाला जाणार आहेत. त्यासाठीच्या नियोजनाची बैठक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे वरिष्ठ उपाध्यक्ष माजी आ. लहू कानडे यांनी शनिवार दिनांक ७ जून रोजी सकाळी ९ वाजता त्यांचे संपर्क कार्यालयातील सभागृहात, श्रीरामपूर येथे आयोजित केली आहे. त्यानिमित्ताने सभासद नोंदणी आढावा, तालुका जिल्हा पातळीवर नवीन पदाधिकाऱ्यांच्या नेम णुका आणि पुणे येथे वर्धापन दिनास जाणे नियोजन इ. विषयावर चर्चा होणार आहे. स्वर्गीय खा. गोविंदराव आदिक यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित मोफत हृदय विकार व रक्तदाब तपासणी शिबीरास गंगाधर ओगले साखर कामगार हॉस्पीटल, नेवासा रोड, श्रीरामपूर येथे सर्वांना उपस्थीत राहावे, असे आवाहन प्रदेश सरचिटणीस अरुण नाईक, आणि कार्याध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस शिर्डी लोकसभा अशोक (नाना) कानडे यांनी केले आहे.

# ३५ वर्षानंतर विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा



जनता आवाज वृत्तसेवा

**वडाळा महादेव :** श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय या ठिकाणी १९९० - ९१ इयत्ता दहावी बॅचचा स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात पार पडला.

साधारण पहिली वर्गापासून एकत्र असलेले बालमित्र दहावीच्या वर्गानंतर विविध क्षेत्रात शिक्षण घेऊन नोकरी व्यवसाय निमित्त बाहेरगावी गेले. परंतु सण यात्रा उत्सव या निमित्ताने एकत्र येत असत. यावेळी अनेकांनी सर्वांना गेट-टुगेदर करण्याची सूचना मांडली. त्यानुसार येथील प्रगतशील शेतकरी माणिक पवार, कैलास कसार, संजय वळकुंटे यांनी संकल्पना मित्र संतोष कुदळे यांच्याकडे सुचवितास त्यांनी माजी ग्रामपंचायत सरपंच अविनाश पवार, गुरुदेव डॉ. काटे स्वामी पतसंस्थेचे चेअरमन अनिरुद्ध महाले, उपसरपंच प्रदीप कसार, पत्रकार राजेंद्र देसाई, विश्वस्त बी. एन. पवार, मंजुषा मिसाळ यांच्याकडे मांडली. सर्वानुमते कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मोबाईल फेसबुक किंवा व्हाट्सअप या ऐवजी प्रत्यक्षात या स्नेहबंध अविस्मरणीय कार्यक्रमासाठी सर्व मित्र मैत्रिणी यांनी एकत्र येत जुन्या आठवणींना उजाळा दिला. यामध्ये अनेक जण बालपणापासूनच शाळेत सोबत होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चेअरमन अनिरुद्ध महाले यांनी केले. तर प्रास्ताविक संतोष कुदळे यांनी करत उपस्थित मित्र मैत्रिणी यांचा यावेळी जन्मदिवस देखील साजरा करण्यात आला.

# समाजात धर्म व जातीला महत्व प्राप्त झाले

## ॲड. होडगर; राजमाता होळकर यांची जयंती साजरी

जनता आवाज वृत्तसेवा

**आश्वी :** आज देशात महापुरुष आडचणीत आले आहेत. राजकारणाचा पोत बदलल्यामुळे समाजात धर्म आणि जातीला महत्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे जाती धर्माच्या भिंती पुन्हा उभ्या राहु लागल्या आहेत. महापुरुष देखील समाजाने वाटून घेतले. मात्र, आश्वी बुद्रुक येथील कार्यक्रमास गावातील विविध समाजातील नागरीकांनी एकत्र हजेरी गावामध्ये नवा पायंडा पडल्याचे मत मांची हिल संस्थानचे संस्थापक ॲड.शाळीग्राम होडगर यांनी व्यक्त केले.



आश्वी बुद्रुक (ता. संगमनेर) येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना जेष्ठ मार्गदर्शन ॲड. शाळीग्राम होडगर बोलत होते. याप्रसंगी माजी सरपंच बाळकृष्ण होडगर, संचालक विजयराव म्हसे, अजय ब्राम्हणे, भाऊसाहेब जऱ्हाड, ॲड. रोहीणी निघुते, सरपंच नामदेव शिंदे, उपसरपंच बबनराव शिंदे, गिताराम गायकवाड, माधवराव गायकवाड, अण्णासाहेब जऱ्हाड, भाऊसाहेब खेमनर, राहुल जऱ्हाड, नामदेव होडगर, हरीभाऊ ताजणे, गणेश खेम नर, अशोक खेमनर, अण्णा खेमनर, राजेंद्र होडगर, संदिप बाचकर, संदिप खेमनर यांच्यासह पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ॲड. शाळीग्राम होडगर म्हणाले की, ३०० वर्षानंतर राज्य शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यमंत्री मंडळाची बैठक चौंडी गावात घेण्यात आली.

# बदलते ज्ञान शिक्षकांना मिळणे महत्वाचे

## शिवाजी कराड; निवडश्रेणी प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन

जनता आवाज वृत्तसेवा

**कुकाणा :** शैक्षणिक धोरणे बदलत असून ज्ञानात काळानुरूप बदल होत असताना आजच्या शैक्षणिक प्रक्रियेतील बदलते ज्ञान शिक्षकांना मिळणे महत्वाचे आहे. प्रशिक्षणातून शिक्षकांना शिक्षण पद्धतीतील बदलत्या ज्ञानाची सखोल माहिती मिळत असते, असे प्रतिपादन नेवाशाचे गटशिक्षणाधिकारी शिवाजीराव कराड यांनी केले.



नेवासा फाट्यावरील त्रिमूर्ती संकुलात राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांचे वतीने उच्च माध्यमिक, माध्यमिक व प्राथमिक शिक्षकांच्या वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणी प्रशिक्षण शिबिराचे उदघाटन शिक्षणाधिकारी कराड यांचे हस्ते करण्यात आले. त्यावेळी त्यांनी उपस्थित प्रशिक्षणार्थी शिक्षकांना मार्गदर्शन केले.

गट शिक्षणाधिकारी कराड म्हणाले, आजच्या शैक्षणिक स्थितीची माहिती प्रशिक्षणातून मिळते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, शिक्षण हक्क कायदा, आपत्ती व्यवस्थापन, मूल्य मापन आदी माहिती शिक्ष कांना मिळणार आहे.

वरिष्ठ वेतन श्रेणीसाठी १२ व निवड श्रेणीसाठी २४ वर्षे सेवा झालेल्या शिक्षकांसाठी हे प्रशिक्षण येत्या १२ जून पर्यंत सुरु राहणार आहे.

तालुक्यातील २१२ प्रशिक्षणार्थी शिक्षक या प्रशिक्षणात सहभागी झाले आहेत. विषय तज्ज्ञ समी शेख यांचेसह प्रशिक्षण तज्ञ मार्गदर्शक डॉ. रेवन्नाथ पवार, अविनाश निकाळजे, सुभाष जाधव, विजय देठे, बाळकृष्ण गंधारे, अरविंद गायकवाड, विठ्ठल कांगुणे, रामराव काळे यांनी सकाळ व दुपार सत्रात विविधविषयावर मार्गदर्शन केले.

# साबळे यांचा सेवापुर्तीनिमित्त सपत्नीक सत्कार

जनता आवाज वृत्तसेवा

**कोपरगाव शहर :** कोपरगाव तालुक्यातील कोकमठाण येथील रहिवासी दादासाहेब चंद्रकांत साबळे हे भारतीय डाक सेवेतून ३८ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेतून ग्रामीण डाक सेवक म्हणून नुकतेच सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्ताने कोपरगाव डाक विभागाच्यावतीने व भारतीय बौध्द महासभा यांच्या संयुक्त विद्यमाने साईबाबा कॉर्नर येथील महात्मा गांधी चॅरिटेबल ट्रस्ट प्रदर्शन हॉलमध्ये सत्कार समारंभाचे आयोजन केले होते.




या कार्यक्रमाचे प्रमुख उपस्थिती म्हणून कोपरगाव विधानसभा मतदारसंघाचे आम दार आशुतोष काळे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून डाक निरीक्षक अनंत सोनवणे व सब पोस्टमास्टर राजेश नेतनकर तसेच गोदावरी दूध संघाचे अध्यक्ष राजेश परजणे व भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष शांताराम रणशूर आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. आमदार काळे यांच्या हस्ते सेवानिवृत्त दादासाहेब साबळे व हिराबाई साबळे यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर नानासाहेब साबळे यांनी काळे यांचा सत्कार केला. पत्रकार बिपिन गायकवाड यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यानंतर आमदार काळे, कार्यक्रमाचे अध्यक्ष अनंत सोनवणे, काळे कारखान्याचे संचालक सुधाकर रोहम, कोपरगाव तालुका जिनिंग प्रेसिंग सोसायटीचे चेअरमन गोरक्षनाथ जामदार, एस. जी. विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक रमेश गवळी, महाराष्ट्र राज्य सरपंच परिषदेचे उपाध्यक्ष बाळासाहेब जपे, सेवानिवृत्त पोस्टमास्तर राजेंद्र नानकर, पंचायत समितीचे माजी उपसभापती अर्जुन काळे आदींनी आपली मनोगते व्यक्त केली.

# हिवरेबाजारचे पर्यावरण संवर्धनाचे काम दीपस्तंभासारखे : आनंद भंडारी

जनता आवाज वृत्तसेवा

**हिवरेबाजार :** हिवरेबाजार येथे गुरुवार दि. ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्ताने एक वृक्ष आईसाठी, एक वृक्ष देशासाठी मातृस्मृती वनमंदिर येथे संत श्री. ज्ञानेश्वर माऊली यांच्या ७२५ वा संजीवन समाधी सोहळा, जगद्गुरु श्री. संत तुकोबारायांचा ३७५ वा वैकुंठगमन सोहळा, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती औचित्य साधून एकूण बेरीज १४०० देशी वृक्षांची लागवड शुभारंभ आनंद भंडारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते करण्यात आला. दिनांक ५ जून ते ५ जुलै या कालावधीत विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात येणार आहे.

हिवरे बाजार येथे पद्मश्री पोपटराव पवार यांच्या नेतृत्वाखाली सन १९८९ पासून १० लाख वृक्षांची लागवड करून संवर्धन करण्यात आले असून आज जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून केलेली वृक्षलागवड हे पर्यावरण संवर्धनाचे दृष्टीने दीपस्तंभासारखे आहे, असे उद्गार आनंद भंडारी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर यांनी काढले. आनंद



भंडारी म्हणाले, जागतिक तापमानवाढीची समस्या संपूर्ण जगाला भेडसावत असून परिणामी हिमशिखरे वितळून समुद्राकाठची शहरे पाण्याखाली जाण्याची शक्यता पर्यावरण तज्ञांनी व्यक्त केली आहे. मी प्रशासकीय सेवेत आल्याबरोबर कामाची सुरूवात हिवरे बाजार पासून केली आहे. यापूर्वी हिवरे बाजारला ७ ते ८ वेळा भेट दिली असून हिवरे बाजारमधील झालेली विकासकामे लोकसहभागामुळे अतिशय गुणवत्तापूर्ण झालेली असून इतरांनी येथील विकासकामांच्या गुणवत्तेचा आदर्श घेण्याची गरज आहे. गावांसाठी आदर्शवत विकासकामे झालेली विकासकामातील सातत्यामुळे हिवरे बाजार हे विकासकाम ंची ग्रामपंढरी आहे. माझ्या २२ वर्षाच्या प्रशासकीय सेवेमध्ये हिवरे बाजारने ग्राम विकासाला दिशा दिलेली आहे.

यावेळी दादाभाऊ गुंजाळ उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत विभाग जि. प. अहिल्यानगर, दिलीप सोनकुसळे गटविकास अधिकारी पंचायत समिती अहिल्यानगर, अंबादास गारुडकर केंद्रप्रमुख चास, सरपंच विमलताई ठाणगे, चेअरमन छबुराव ठाणगे, व्हा. चेअरमन रामभाऊ चत्तर, दुध संस्था चेअरमन बाबासाहेब गुंजाळ, हरिभाऊ ठाणगे, एस. टी. पादीर, रो. ना. पादीर, बाबासाहेब जाधव मुख्याध्यापक व सर्व स्टाफ जि. प. प्राथ. शाळा, मुरलीधर अमृते मुख्याध्यापक यशवंत माध्यमिक विद्यालय व सर्व स्टाफ यांच्यासह विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिमला न जाता स्लिम!

आजकालच्या प्रत्येकाला आपण बारीक असावे, असे वाटत असते. बारीक असल्यामुळे हवी ती फॅशन करता येते. परंतु, जाड शरीरयष्टी असलेल्यांचा मात्र मूड जातो. मग बारीक होण्यासाठी जिम हा पर्याय निवडला जातो. परंतु, काही वेळा जिम लावली किंवा डाएट केले तरी वजन कमी होत नाही. काही ड्रेसिंग टिप्स फॉलो केल्यावर तुम्ही सहज बारीक दिसू शकता. बऱ्याचदा ड्रेसिंग करताना काही गोष्टी लक्षात ठेवणे फार गरजेचे असते. तुम्ही कपड्यांची योग्य निवड केली तर त्या कपड्यात बारीक दिसू शकता. त्यामुळे कपडे निवडताना काळजी घेणे फार महत्त्वाचे आहे. * कपड्याचे फिटिंग उत्तम असावे : तुम्ही परिधान करत असलेले कपडे जास्त घट्ट किंवा जास्त सैल नसावे. त्याचे फिटिंग परफेक्ट असावे. कपड्याचे फिटिंग परफेक्ट असल्यास तुम्ही स्लिम दिसाल. * डार्क रंगाचे कपडे परिधान करावे : डार्क रंगाचे कपडे परिधान केले तर बारीक दिसण्यास मदत होईल. कारण डार्क रंगाचे कपडे दिसायला ही खूप सुंदर दिसतात. तुम्ही याकरता काळा, राखाडी, तपकिरी, मरुन इत्यादी रंगाचे विविध प्रकारचे कपडे परिधान करु शकता. * मोठ्या प्रिंट्सचे कपडे परिधान करणे टाळा : कपडे खरेदी करताना मोठ्या प्रिंटेडचे कपडे खरेदी करु नका. कारण मोठ्या प्रिंटमुळे तुम्ही अधिक जाड दिसू शकता. त्यामुळे कपडे खरेदी करताना बारीक प्रिंटचे कपडे खरेदी करा. * कॉन्ट्रास्ट कपडे परिधान करु नये : सेम रंगाचे कपडे परिधान केल्यामुळे तुम्ही स्लिम दिसू शकता. तुम्ही कॉन्ट्रास्ट कपडे परिधान केले तर त्यात जाड दिसू शकता. * वर्टिकल लाइन्सचे कपडे परिधान करावे : वर्टिकल लाइन्स असलेले कपडे तुम्हाला स्लिम लूक देतील. त्यामुळे कधीही हॉरिजेंटल किंवा क्रॉस लाइन्सचे कपडे परिधान करु नये. यामुळे तुम्ही अधिक जाड दिसाल.

**ग्रुमिंग**

**जगभरात २३ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय विधवा दिन म्हणून साजरा केला जातो. भारतात अंदाजे ४२ दशलक्ष विधवा महिला आहेत. आपल्या देशामध्ये विधवांबद्दल अजूनही काही गैरसमज प्रचलित आहेत. त्यामध्ये परिवर्तन होणे अत्यंत आवश्यक आहे.**

# संवेदनशील अमित!

तीन वर्षांचा असतानाच अमित वडील गेले. घर चालवण्यासाठी त्याच्या आईने शिवणकामाचे छोटेसे दुकान उघडले. त्याच्या कुटुंबावर जुन्या कर्जाचा बोजा होता. त्यामुळे त्याचे काका त्याच्या शिक्षणाचा आणि इतर गरजांचा खर्च करत. दरम्यान, समाज त्याच्या विधवा आईला धार्मिक किंवा सामाजिक कार्यक्रमांपासून दूर ठेवत होता. त्याच्या भावाच्या लग्नामध्ये तिला मेहंदी लावण्याचीदेखील परवानगी नव्हती. तो अनेक वेळा आईची बाजू घेण्याचा प्रयत्न करायचा, परंतु प्रत्येक वेळी समाजासमोर असहाय्य ठरत होता. त्यातूनच प्रेरणा घेऊन विधवा महिलांच्या सक्षमीकरणासाठी अमितने 'मिट्टी के रंग' नावाची संस्था स्थापन केली.

ही संस्था स्थापन करण्याची प्रेरणा आईने त्याला दिली. त्याच्या अंगी असलेल्या गुणांकडे बघून आईने विधवा महिलांसाठी काही तरी कर, असा सल्ला दिला. परंतु, त्याला सामाजिक कार्याचा फारसा अनुभव नव्हता. सुरुवातीला अनुभव मिळवण्यासाठी त्याने काही संस्था आणि देणगीदार यांच्यामधील मध्यस्थ म्हणून काम करायला सुरुवात केली आणि अवघ्या दीड वर्षामध्ये शंभरहून अधिक स्वयंसेवक तयार केले. पुरेसा अनुभव पाठीशी असल्याची खात्री करून त्याने पुण्यात 'मिट्टी के रंग' नावाची स्वतःची संस्था सुरू केली.

या संस्थेचा मुख्य उद्देश भारतातील विधवा आणि अविवाहित महिलांना हिंसाचाराविरुद्ध थेट कारवाई करण्यासाठी तसेच त्यांचे पुनर्वसन करुन सक्षम करण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देणे असा आहे. आत्मविश्वासाच्या जोरावर गेल्या वर्षी त्याने कॉमनवेल्थ युथ कौन्सिलचा सदस्य होण्यासाठी अर्ज केला. तो लगेच स्वीकारण्यात आला. या सदस्यत्वाचा फायदा असा झाला की त्याच्या सामाजिक कार्याशी संबंधित विचारांची व्याप्ती भारतातच नव्हे तर इतर देशांमध्येही पोहोचली. त्यातून त्याची मानसिक जडणघडण झाली. आता सहकाऱ्यांच्या मदतीने तो गुरुग्राम, गाझियाबाद आणि मुंबई येथे केंद्रे सुरू करणार आहे. येथील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी त्याची संस्था रांगोळी डिझायनिंग, बॅग मेकिंग, विविध प्रकारची शिल्पे आणि इतर प्रकारच्या हस्तकला उत्पादनांचे प्रशिक्षण देत आहे. इथून बाहेर पडलेल्या महिलांना विविध कंपन्यांमध्ये नियमित नोकरीही मिळाली आहे. पुण्यात आणखी तीन केंद्रे सुरु करण्याचा आणि त्या माध्यमातून अनेक

**अचिव्हर**






## शेर की जुबानी

किसी के दिल में
क्या छुपा है, ये बस
खुदा ही जानता है
दिल अगर बेनकाब होते
तो कितना बवाल होता।

पल दो पल मेरे साथ बिताना तुम
हो सके तो इस बरसात
ठहर जाना तुम।

एकही बात इन लकिरों में
अच्छी है, धोका देती है,
मगर रहती हाथ में ही है।

## सोशल मीडिया

### जीमेलचे सीक्रेट फिचर्स

तुम्ही अनेक वर्षांपासून जीमेलचा वापर करत असाल. पण त्यातील काही खास फिचर्सबद्दल जाणून घेऊ या. * गोपनीय ईमेल आपण जीमेलद्वारे पाठवू शकतो. ते इनेबल करण्यासाठी नवीन ई–मेल पाठवताना तुम्हाला लॉक साईनवर क्लिक करावे लागेल. * इंटरनेटशिवाय मेल्स बघायचे असल्यास व्ह्यू ई–मेल्स ऑफलाईन हा पर्याय आहे. यासाठी सेटिंग्जमध्ये जाऊन Enable offline email वर क्लिक करावे लागेल. * जीमेल मध्ये आपण शॉर्टकट किजही वापरू शकतो. मार्क अॅज रीड करण्यासाठी Shift + I दाबा. ईमेल पाठवण्यासाठी Command किंवा Ctrl + Enter दाबा. याशिवाय, रेसीपिएंट अॅड करण्यासाठी Shift + Ctrl + B दाबा.

## स्मार्ट टिप्स

### व्हॉट्सॲपवर टाका मोठा व्हिडीओ



व्हॉट्सॲपने युजर्ससाठी एक नवीन आणि उपयुक्त फीचर आणण्याची तयारी केली आहे. त्यामुळे आता स्टेटसमध्ये मोठा व्हिडीओ टाकणे सोपे होणार आहे. आता व्हिडीओची लांबी एक मिनिटाची नाही तर ९० सेकंदांची राहणार आहे. यापूर्वी तुम्ही एकावेळी फक्त ६० सेकंद पर्यंतचा व्हिडीओ अपलोड करू शकत होता. म्हणजेच आता ही मर्यादा ३० सेकंदांनी वाढवली जाणार आहे. याचा थेट फायदा मोठे व्हिडीओ स्टेटस शेअर करणाऱ्यांना होऊ शकतो. अर्थात सध्या हे फीचर फक्त व्हॉट्सॲप च्या बीटा व्हर्जनमध्ये उपलब्ध आहे. याचा अर्थ असा आहे की ॲपची चाचणी आवृत्ती वापरतात तेच हे फीचर वापरू शकतात. लवकरच हे फीचर सर्व वापरकर्त्यांसाठी जारी केले जाईल. हे नवीन फीचर व्हॉट्सॲप अँड्रॉइड व्हर्जन २.२५.१२.९ मध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहे.

## ॲप वर्ल्ड

### हटके अन् कलरफुल ईयरबड्स!



कुठेही बाहेर जाताना आपण मोबाईलसोबतच ईयरबड्स नक्कीच घेतो. अनेकदा ते सामान्य माणसाच्या खिशाला परवडणारे नसतात. पण आता खिशाला परवडणारे आणि हटके डिझाइन असणारे ईयरबड्स लॉन्च झाले आहेत. 'प्रोमेट'ने 'नथिंग' ईयरबड्स लॉन्च केलेत. याची किंमत दोन हजारांच्या आत आहे. या ईयरबड्सचं डिझाइन खास असून ते ट्रान्सपरंट आहेत. ब्लॅक, ब्लू, व्हाईट, पिंक या रंगामध्ये हे ईयरबड्स उपलब्ध आहेत. हे ईयरबड्स २६ तासांपेक्षा जास्त प्लेबॅक टाइम देतात. ॲक्टिव्ह नॉईझ कॅन्सिलेशन फिचरदेखील या ईयरबड्समध्ये आहे.

## स्मार्ट ॲडव्हाइज

### स्टोरी, रीलससाठी 'या' स्टिकर्सची मदत

लाखो लोक त्यांचे कौशल्य दाखवण्यासाठी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा उपयोग करत असतात. इन्स्टाग्रामवर एखादी फोटो स्टोरी शेअर करताना तुम्ही तिथे काही नवीन स्टिकर्स पाहिले असतील. स्टोरी तयार करताना स्टिकर्स चिन्हावर टॅप करा आणि 'रिव्हल' स्टिकर निवडा. पोस्ट केलेल्या स्टोरीमागे काय असू शकते, याविषयी युजर्सना संदेश लिहिण्यासाठी तुम्हाला सूचित केले जाईल. स्टोरी पोस्ट केल्यानंतर तुम्ही डीएम केले तरच फॉलोवर्स तुमची स्टोरी पाहू शकतात. इन्स्टाग्रामने फ्रेम्स स्टिकरदेखील जोडले आहे. हे स्टिकर तुम्हाला फोटो व्हर्च्युअल पोलरॉइडमध्ये बदलू देतो. ते पाहण्यासाठी वापरकर्त्यांना त्यांचे फोन हलवावे लागतील किंवा शेक टू रिव्हल बटण दाबावे लागेल. 'कटआउट' या फिचरमध्ये वापरकर्त्यांना फोटो किंवा व्हिडीओचा एक भाग स्टिकरमध्ये रूपांतर करून घेता येईल. वापरकर्ते बोटांनी फोटो किंवा व्हिडीओमधून एखादा फोटो कट करू शकतात.

# पेट ग्रुमिंगचे हटके क्षेत्र

प्राण्यांची आवड असणाऱ्यांसाठी पेट ग्रूमिंग हे फायदेशीर क्षेत्र आहे. 'पेट ग्रूमर्स' नक्की काय करतात? तर प्राणी सुंदर दिसावेत म्हणून हे पेट ग्रूमर्स विविध प्रयत्न करत असतात. त्याचबरोबर प्राण्यांची काळजी घेणे, स्वच्छता ही देखील ग्रूमर्सची जबाबदारी असते. कुत्र्यांना अंघोळ घालणे, केस कापणे, केसांच्या स्टाइल्स करणे, नखे कापणे, गरज असल्यास मसाज करणे, स्पा करणे, प्राण्यांच्या त्वचेची निगा राखणे अशी कामे ग्रूमर्स करतात. म्हणजेच माणसांसाठी जसे ब्यूटी पार्लर, स्पा असते तशा सुविधा प्राण्यांना देण्याचे काम पेट ग्रुमर्स. ऐच्छिक कालावधीसाठी काम करण्याची मुभा, कमी भांडवलावर व्यवसायाची सुरुवात करता येणे ही या क्षेत्राची बलस्थाने आहेत. या क्षेत्रामध्ये काम करण्यासाठी ठराविक शैक्षणिक पात्रता असणे गरजेचे नाही. मात्र पाळीव प्राण्यांच्या प्रजाती, स्वभाव वैशिष्ट्ये, शरीररचना तसेच प्राथमिक वैद्यकीय माहिती असणे गरजेचे आहे. त्याचबरोबर संयम आणि एका जागी खूप वेळ उभे राहून काम करण्याची क्षमताही गरजेची आहे. परदेशात अनेक विद्यापीठ आणि संस्थांमधून पेट ग्रूमिंगचे प्रशिक्षण दिले जाते. इंग्लंडमधील हॅडलो कॉलेज, ऑस्टेलियन स्कूल ऑफ पेटकेअर स्टडीज येथे पदविका अभ्यासक्रम आहेत. ए.सी.एस. डिस्टंस एज्युकेशन, नॅशनल असोसिएशन ऑफ प्रोफेशनल पेट सिटर्स या संस्था ऑनलाही खासगी संस्था या विषयाचे प्रशिक्षण देतात. बंगळुरु येथील फुझी–वुझी पेट ग्रुमिंगचे प्रशिक्षण देते. तसेच दिल्ली येथील स्कूबी स्क्रब ही संस्था प्रशिक्षण वर्ग चालवते. बेसिक आणि ॲडव्हान्स असे दोन स्तरात हे प्रशिक्षण दिले जाते. या संस्थेच्या पुण्यासह देशात १९ शाखा आहेत. पेट बोर्डिंग म्हणजे ठराविक कालावधीसाठी प्राणी ठेवण्यात येतात असे आश्रम, पशूवैद्य, पेट स्पा किंवा पार्लर्स, प्राण्यांसाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था या ठिकाणी कामाची संधी मिळू शकते. त्याचप्रमाणे स्वतःचे स्पा सेंटर सुरू करणे, फिरते पार्लर सुरू करणे, घरोघरी जाऊन सेवा देणे अशा प्रकारे स्वतःचे व्यवसायही सुरू करता येऊ शकतात.

**वेगळ्या वाटा**



# पर्यावरणपूरक पर्यटनासाठी...

गेल्या वर्षभराच्या काळात पर्यटनाला नवे आयाम मिळाले आहेत. लोक निसर्गाच्या जवळ जाऊ लागले आहेत. शहरातलं धकाधकीचं जीवन आणि सिमेंटचं जंगल सोडून निसर्गरम्य वातावरणात रमणं प्रत्येकालाच हवंहवंसं वाटू लागलं आहे. आपल्या भारतात काही पर्यावरणपूरक पर्यटनस्थळं आहेत. त्यामुळे पुढच्या वेळी पर्यटनाला निघायचं असेल तर या ठिकाणांचा विचार करायला हरकत नाही.




* सिक्कीम हे देशातलं पूर्वेकडचं राज्य. सिक्किममधलं कांचनजंगा राष्ट्रीय उद्यान पर्यटकांच्या आकर्षणाचं केंद्र आहे. या ठिकाणी तुम्ही ट्रेकिंगचा आनंद लुटू शकता. कांचनजंगा राष्ट्रीय उद्यानातला निसर्ग आपलं मन मोहवून टाकतो. इथली घनदाट झाडी, डोंगरदऱ्या निवांततेची अनुभूती देतात. या राष्ट्रीय उद्यानात विविध प्रजातींचे प्राणीही पहायला मिळतात. त्यामुळे पुढच्या सहलीसाठी सिक्किमला जायला हरकत नाही.



* आशियातलं सर्वात स्वच्छ गाव मेघालयात आहे. मॉलिनाँग असं या गावाचं नाव असून इथेही निवांत क्षण घालवता येतील. इथली स्वच्छता डोळ्यात भरते. इथे प्लास्टिकवर पूर्ण बंदी आहे. इथल्या रस्त्यांवर बांबूच्या कचऱ्यापेट्या पहायला मिळतात. इथल्या लोकांना निसर्गाचं भान असून ते पर्यावरणरक्षणासाठी कटिबद्ध आहेत. इथे येऊन पर्यावरणरक्षणाचे धडे गिरवता येतील.

**भटकंती**



* केरळमधलं थेनमला हे ठिकाणही पर्यावरणपूरक पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे. गर्द झाडी हे इथलं वैशिष्ट्य. निसर्गाच्या सानिध्यात रमायला आवडत असेल तर या ठिकाणी जायला हवं. पक्षीनिरिक्षणाचा छंद असेल तर इथे यायला हवं. इथे ट्रेकिंगची सोयही आहे.

# ट्रेंड टाय डाय टी शर्टचा

दोस्तांनो, एकाच पद्धतीच्या, प्लेन आणि कंटाळवाण्या टी शर्टसचा जमाना कधीच मागे पडला आहे. बाजारात रंगीबेरंगी, ट्रेंडी टी शर्टस उपलब्ध आहेत. त्यातच सध्या टाय डाय प्रिंट्सची चांगलीच चलती असल्याचं दिसून येत आहेत. हे रंगीत, आकर्षक आणि फंकी टी शर्टस तरुणांचं लक्ष वेधून घेत आहेत. टाय डाय हा प्रकार हिप्पी समुदायामुळे ६० आणि ७० च्या दशकात बराच लोकप्रिय झाला होता. आता हा ट्रेंड पुन्हा आला आहे.

* रंगीबेरंगी टी शर्टसचा ट्रेंड असला तरी काळ्या आणि पांढऱ्या रंगाचा टाय डाय टी शर्ट भाव खाऊन जातो यात शंका नाही. ब्लॅक अँड व्हाईटची फॅशन कधीही जात नाही. त्यामुळे तुम्ही ब्लॅक अँड व्हाईट टाय डाय टी शर्ट नक्की विकत घ्या. साध्या, कॅज्युअल लूकसाठी तुम्ही लाईट वॉश डेनिमवर हा टी शर्ट घालू शकता.

* बेज आणि पांढऱ्या रंगांची सरमिसळ असणारा टाय डाय टी शर्ट नेहमीच्या कॅज्युअल लूकसाठी परफेक्ट आहे. हा टी शर्ट घरी असताना किंवा गरजेच्या वस्तूंच्या खरेदीसाठी बाहेर जाताना घालता येईल.

* पेट्रोल ग्रीन टाय डाय स्वेटशर्ट हटके दिसतो. हा शर्ट हिवाळ्यातच नाही तर उन्हाळ्यातही कॅरी करता येतो. पांढऱ्या, निळ्या किंवा काळ्या जीन्सवर हा शर्ट शोभून दिसेल.

* चंकीफंकी रंगांची आवड असेल तर निऑन ब्लू रंग तुमच्यासाठी आहे. या रंगाचा टाय डाय टी शर्ट घ्या.

* पिंक अँड ब्लॅक टी शर्ट आणि जॉगर्स हे कॉम्बिनेशनही छान दिसेल.

मग काय ई कॉमर्स साईट्सना भेट द्या आणि तुमच्या आवडीचा टाय डाय टी शर्ट विकत घ्या.

**फॅशन पॅशन**




# टँगी कुकीज अँड क्रीम पॉपकॉर्न

दोस्तांनो, तुम्ही विविध फ्लेवर्सचे पॉपकॉर्न खाल्ले असतील. सॉल्टी, चीज, टोमॅटो, कॅरेमल असे एकापेक्षा एक चविष्ट फ्लेवर्सचे पॉपकॉर्न चित्रपट बघताना किंवा सहज म्हणून तोंडात टाकले जातात. तुम्हीही पॉपकॉर्नचे चाहते असाल तर 'कुकीज अँड क्रीम पॉपकॉर्न' नक्की ट्राय करा. हॉस्टेलमध्ये मित्रमंडळींसोबत चित्रपट बघताना किंवा गप्पांचा फड रंगवताना हे पॉपकॉर्न खाता येतील.

**सामग्री:** तयार पॉपकॉर्न, १० ते १५ ओरिओ बिस्किटं आणि व्हाईट व्हॅनिला आल्मंड बार्क

**कृती:** ओरिओ बिस्किटं बारीक कुस्करून घ्या. व्हाईट व्हॅनिला आल्मंड बार्क पाकिटावरच्या सूचनांनुसार वितळवून घ्या. हा बार्क नीट पातळ व्हायला हवा. बाउलमध्ये पॉपकॉर्न घ्या. त्यावर वितळलेला बार्क ओता. वरून ओरिओ बिस्किटांचा चुरा भुरभुरा. हा चुरा सगळ्या पॉपकॉर्नवर पसरायला हवा. आल्मंड बार्क थोडा घट्ट झाल्यावर पॉपकॉन खाता येतील.

**झटपट रेसिपी**



# वजन कमी करण्यासाठी धावताय?

बरेच जण फिटनेससाठी तर काही जण वजन कमी करण्यासाठी धावतात. धावणं हा कार्डिओ वर्कआउटचा एक प्रकार असल्यामुळे बऱ्याच कॅलरी खर्च होतात. मुख्य म्हणजे तुम्ही कुठेही धावू शकता. वजन कमी करणं हे उद्दिष्ट समोर ठेऊन धावणार असाल तर या टिप्स लक्षात ठेवा.

* स्ट्रेचिंग केल्याशिवाय धावायला सुरूवात करू नका. स्ट्रेचिंगमुळे शरीर आणि स्नायू व्यायामासाठी सज्ज होत असल्यामुळे संभाव्य दुखापत टाळता येते. विविध प्रकारचे वॉर्म अप आणि स्ट्रेचिंग व्यायामप्रकार करून तुम्ही स्नायूंना लवचिकता देऊ शकता.

* कोणतेही बूट किंवा चप्पल घालून धावू नका. नियमित धावणार असाल तर दर्जेदार बूट विकत घ्या. चांगल्या बुटांमुळे दुखापत होण्याची शक्यता बरीच कमी होते.

* धावण्याआधी फार खाऊ नका. खाल्ल्यानंतर धावल्यामुळे अन्नपचन होतं हा गैरसमज आहे. कारण धावताना रक्तपुरवठा धावण्याचं कार्य करणाऱ्या स्नायूंच्या दिशेने होत असल्यामुळे पचनसंस्थेकडे कमी प्रमाणात रक्त पोहोचतं. यामुळे अन्नपचन होतच नाही. यामुळे हातापायात तीव्र स्वरूपाचे गोळे येणं तसंच वेदना जाणवण्यासारख्या समस्या निर्माण होऊ शकतात.

* भरपूर पाणी पिणं ही वजन कमी करण्याची गुरुकिल्ली आहे. तुम्ही वजन कमी करण्यासाठी धावत असाल तर सतत पाणी पित रहा. पाण्यामुळे शरीरातली ऊर्जा बराच काळ टिकून राहते. मात्र साखरयुक्त तसंच फसफसणारी पेयं पिऊ नका.

* वजन कमी करण्यासाठी सातत्य आणि चिकाटी हवी. दोन दिवस धावून काहीच फायदा होणार नाही. वजन कमी करणं ही एक धीमी प्रक्रिया आहे. त्यामुळे झपपट निकाल मिळण्याची अपेक्षा करू नका. व्यायामासोबतच सकस आहारही घ्यायला हवा. नियोजनबद्ध पद्धतीने वजन कमी करणं कधीही चांगलं. अतिरेकी डाएटच्या आहारी जाऊ नका.

**फिटनेस फंडा**

